रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १६ ◆ अंक १०७
www.ramprahar.com
शुक्रवार, ३ ऑक्टोबर २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

### ऐतिहासिक विजयासह भारत वर्ल्डकपच्या सेमीफायनलमध्ये



**मुंबई :** येथील वानखेडे स्टेडियममध्ये गुरुवारी (दि. २) झालेल्या सामन्यात यजमान भारतीय संघाने श्रीलंकेवर ऐतिहासिक विजय मिळवला. भारताने प्रथम फलंदाजी करताना ३५७ धावांचा डोंगर उभारला होता. प्रत्युत्तरात श्रीलंकेचा संघ ५५ धावांवर पत्त्यासारखा कोसळला. ३०२ धावांच्या या ऐतिहासिक विजयासह भारताने उपांत्य फेरीचे तिकीट पक्के केले आहे. भारताकडून शुबमन गिल, विराट कोहली आणि श्रेयस अय्यर यांनी अर्धशतकी खेळी केली, तर त्यानंतर भारतीय गोलंदाजांनी श्रीलंकन फलंदाजांच्या एकामागून एक विकेट्स घेतल्या. मोहम्मद शमीने सर्वाधिक पाच विकेट्स घेतल्या. या विजयासह सेमीफायनलमध्ये पोहचणारा भारत हा पहिला संघ ठरला आहे.

अंतरंग
मुंबईतील बसगाड्यांवर बसवली जाणार हवा शुद्धीकरण यंत्रे/२
पाली-खोपोली राज्य मार्गावर मोकाट गुरांचा ठिय्या/५
राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत आजपासून घुमणार कबड्डीचा दम/८

# मनोज जरांगे-पाटीलांचे उपोषण मागे

## मराठा आरक्षणासाठी दिली २ जानेवारीपर्यंतची मुदत

**जालना : प्रतिनिधी**

मराठा समाजाच्या आरक्षणासाठी गेल्या आठवडाभरापासून उपोषणाला बसलेले मनोज जरांगे-पाटील यांनी अखेर गुरुवारी (दि. २) आपले बेमुदत उपोषण मागे घेतले. मराठा समाजाला सरसकट आरक्षण मिळावे यासाठी त्यांनी सरकारला २ जानेवारीपर्यंतची मुदत दिली आहे.



धनंजय मुंडे, उदय सामंत, अतुल सावे, संदीपान भुमरे या मंत्र्यांचे एक शिष्टमंडळ मनोज जरांगे-पाटील यांच्या भेटीसाठी आंतरवाली सराटी येथे गेले होते. त्यापूर्वी दोन माजी न्यायमूर्तींनी त्यांच्याशी चर्चा केली. शिष्टमंडळाची शिष्टाई फळाला आली असून जरांगे-पाटील यांनी दोन पावले मागे येत सरकारला वेळ देण्याची भूमिका घेतली आहे.

या वेळी मनोज जरांगे-पाटील मराठा समाजबांधवांना म्हणाले की, राज्य सरकारला वेळ हवा आहे. सरकारला मराठवाड्यासह संपूर्ण महाराष्ट्रात काम करायचे आहे. त्यांनी तीन आयोग स्थापन केले आहेत. राज्य मागासवर्ग आयोगाला यासाठी काम करायचे आहे. निवृत्त न्यायाधीश संदीप शिंदे यांच्या समितीला काम करायचे आहे. आणखी एक सल्लागार समिती मार्गदर्शक म्हणून काम करणार आहे. त्या समितीलाही काम करायचे आहे. हे सगळे मराठ्यांना टिकणारे आरक्षण देता यावे म्हणून करायचे असल्याचे राज्य सरकारचे म्हणणे आहे. गेली ३५-४० वर्षे आपण वाट पाहिली आहे. आता अजून दोन महिने वाट पाहू.

आता वेळ द्या, पण आरक्षण द्या, असे सांगून जोपर्यंत आरक्षण मिळत नाही तोपर्यंत साखळी उपोषण सुरूच राहील, असे जरांगे-पाटील यांनी स्पष्ट केले आहे.

### आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत
## न्हावे ग्रामपंचायतीत उत्कर्ष ग्रामविकास मंडळाची प्रचार रॅली

### विजयाचे आवाहन; मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



(छाया : प्रफुल्ल कांबळे)

भाजप मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत न्हावे ग्रामपंचायतीत उत्कर्ष ग्रामविकास मंडळाच्या उमेदवारांचा बुधवारी (दि. १) प्रचार करण्यात आला. त्यास मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

न्हावे ग्रामपंचायत निवडणुकीत उत्कर्ष ग्रामविकास मंडळाच्या वतीने थेट सरपंचपदासाठी विजेंद्र गणेश पाटील; तर सदस्यपदासाठी प्रभाग १मधून शैलेश पाटील, जॉर्ज मिनिजेस, अक्षदा भोईर; प्रभाग २मधून राजेश म्हात्रे, रंजना पाटील, सुनिता भोईर; प्रभाग ३मधून सविता ठाकूर, जागृती भोईर आणि प्रभाग क्रमांक ४मधून सागर ठाकूर, नरेश मोकल, ललिता ठाकूर उभे आहेत. त्यांच्या प्रचारार्थ आयोजित रॅलीत भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, माजी सरपंच हरेश्वर म्हात्रे, विजय घरत, सी.एल. ठाकूर, प्रकाश कडू, मीनाक्षी पाटील, कल्पना ठाकूर, राम मोकल, श्रीधर मोकल, कृष्णा मोकल, शंभो मोकल, बाळकृष्ण ठाकूर, हरेश्वर कडू, अरुण मोकल, गोपीचंद ठाकूर, सदाशिव ठाकूर, गणेश मोकल, गुरूनाथ मोकल, महादेव ठाकूर, मोरेश्वर पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते सहभागी झाले होते.

## प्रत्येक निवडणुकीत भूमिका बदलणाऱ्या शेकापच्या जयंत पाटलांनी पक्षनिष्ठा शिकवू नये!

### खासदार सुनील तटकरे यांचा टोला

**अलिबाग : प्रतिनिधी**

नेतृत्व बदल झाला असला तरी मी कालही राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये होतो आणि आजही आहे. प्रत्येक निवडणुकीत आपली भूमिका बदलणाऱ्यांनी मला पक्षनिष्ठा शिकवू नये, असा टोला राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी शेकापचे सरचिटणीस आमदार जयंत पाटील यांना लगावला आहे.

खासदार सुनील तटकरे गुरुवारी (दि. २) अलिबाग दौऱ्यावर आले होते. त्या वेळी येथील शासकीय विश्रामगृहात आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. राष्ट्रवादीचे अलिबाग-मुरूड विधानसभा मतदारसंघ अध्यक्ष अमित नाईक, चारूहास मगर या वेळी उपस्थित होते.



'माझी राजकीय कारकिर्द काँग्रेसमधून सुरू झाली. त्यानंतर ज्येष्ठ नेते खासदार शरद पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष स्थापन केला. मी त्यांच्याबरोबर गेलो. पक्ष नवीन स्थापन केला तरी विचार एकच होता. त्याचप्रमाणे भविष्यातील नेता म्हणून अजित पवार यांचे नेतृत्व स्वीकारून त्यांच्याबरोबर गेलो आहोत. आम्ही पक्ष बदललेला नाही. आमचा पक्ष राष्ट्रवादी काँग्रेसच आहे. शेकापचे सरचिटणीस आमदार जयंत पाटील यांनी मात्र प्रत्येक निवडणुकीत आपली भूमिका बदललेली आहे. त्यांनी आधी शिवसेनेबरोबर युती केली होती. त्यानंतर आमच्या राष्ट्रवादी काँग्रेबरोबर युती केली. अशा प्रकारे जयंत पाटील यांनी वारंवार आपल्या राजकीय भूमिका बदलल्या आहेत, असे खासदार सुनील तटकरे म्हणाले.

२००९च्या लोकसभा निवडणुकीत शेकापने शिवसेनेशी युती केली. नंतर २०१४च्या लोकसभा निवडणुकीत शिवसेनेशी युती तोडली आणि स्वतःचा उमेदवार उभा केला. पुढे २०१९च्या लोकसभा निवडणुकीत त्यांनी राष्ट्रवादीशी आघाडी केली आणि आता ते इंडिया आघाडीत सहभागी झाले आहेत, याकडे खासदार तटकरेंनी लक्ष वेधले. **(पान २ वर..)**

### एसटी महामंडळाला मिळणार मोठी मदत

**दिवाळीपूर्वी होणार वेतन**

**मुंबई : प्रतिनिधी**

अंगणवाडीसेविकांनंतर आता एसटी कर्मचाऱ्यांची दिवाळीही गोड होणार आहे. एसटी कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र महाराष्ट्र सरकारने गोड बातमी दिली आहे. यामुळे एसटी कर्मचारी व त्यांच्या परिवाराच्या चेहऱ्यावर हास्य फुलणार आहे. सरकारकडून एसटी महामंडळाला मोठी मदत केली जाणार आहे.

एसटी महामंडळाला दिवाळीपूर्वी वेतनासाठी ३७८ कोटींची मदत महाराष्ट्र सरकारकडून दिली जाणार आहे. त्यामुळे एसटी कर्मचाऱ्यांचे वेतन दिवाळीपूर्वी होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

### चिरनेरमध्ये भाजपची सभा



**उरण : चिरनेर ग्रामपंचायतीमध्ये भाजपचे थेट सरपंचपदाचे उमेदवार प्रतिक गोंधळी आणि सदस्यपदाच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ भाजप मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांच्या उपस्थितीत गुरुवारी जाहीर सभा झाली.** (छाया : जीवन केणी) **वृत्त पान ३ वर..**

## निवडक

### मुंबई विद्यापीठ राष्ट्रीय शैक्षणिक धोरण राबविणार

**मुंबई :** येथील विद्यापीठातील महाविद्यालयांमध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी केली जाणार आहे. येत्या शैक्षणिक वर्षापासून ही अंमलबजावणी होईल. बीए, बीकॉम, बीएस्सी ३/४ वर्षीय पदवी अभ्यासक्रमांना विद्या परिषदेची मंजुरी मिळाली आहे. मुंबई विद्यापीठाकडून या संदर्भात माहिती देण्यात आली. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीत मुंबई विद्यापीठ पुढे असल्याचे सांगण्यात येत आहे.

### तेलंगणामध्ये भाजपच्या उमेदवारांची तिसरी यादी

**नवी दिल्ली :** तेलंगणा विधानसभा निवडणुकीसाठी भाजपने ३५ उमेदवारांची तिसरी यादी जाहीर केली आहे. ज्युबिली हिल मतदारसंघात एल. दीपक रेड्डी यांना उमेदवारी देण्यात आली असून त्यांची लढत पूर्वाश्रमीचे क्रिकेटपटू आणि काँग्रेसचे उमेदवार अझरुद्दीन यांच्याशी होईल.

## इंडिया आघाडीत बिघाडी

### नितीश कुमार यांचा काँग्रेसवर घणाघात

**पाटणा : वृत्तसंस्था**

भाजपला २०२४च्या लोकसभा निवडणुकीत आव्हान देण्यासाठी विरोधी पक्षांनी एकत्र येत इंडिया आघाडीची स्थापना केली आहे, मात्र या आघाडीतील नेते व बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी या आघाडीत म्हणावे तसे काम होत नाही आणि काँग्रेसला पाच राज्यांच्या निवडणुकांमध्येच रस असल्याची टीका केली आहे. त्यामुळे इंडिया आघाडीत सारेकाही आलबेल नसल्याची चर्चा सुरू झाली आहे.



भारतीय कम्युनिस्ट पक्षाने पाटणा येथे सभा आयोजित केली होती. या सभेत बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी काँग्रेसबद्दल जाहीर नाराजी व्यक्त केली. काँग्रेस आजकाल पाच राज्यांच्या निवडणुकांमध्ये व्यस्त आहे. या राज्यांच्या निवडणुका संपताच ते पुन्हा बैठका बोलावतील. आघाडीतील सर्व पक्ष काँग्रेसला पुढे नेण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. त्यांना मात्र या सर्व गोष्टींची आतापासूनच चिंता नाही, अशी टीका त्यांनी काँग्रेसवर केली.

इंडिया आघाडीतील पक्षांना एकत्र आणण्यात मुख्यमंत्री नितीश कुमार यांची महत्त्वाची भूमिका आहे. भाजपसोबतची युती तोडल्यानंतर नितीश कुमार देशातील विरोधी पक्षांना एकत्र आणण्यासाठी परिश्रम घेत होते. आघाडीची पहिली बैठक पाटणामध्येच झाली होती. आता मात्र नितीश कुमार यांनी वेगळा सूर लावला आहे.

## रायगडात ३३ ग्रामपंचायतींची निवडणूक बिनविरोध

### ३८ सरपंचांची बिनविरोध निवड

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील ३३ ग्रामपंचायतींची निवडणूक पूर्णपणे बिनविरोध झाली आहे. यामध्ये महाड तालुक्यात सर्वाधिक आठ ग्रामपंचायतींचा समावेश आहे. याशिवाय जिल्ह्यात ३८ ठिकाणी सरपंच बिनविरोध निवडून आले आहेत, तर ५६४ सदस्यांची निवडणूक बिनविरोध झाली आहे. आता १७७ ग्रामपंचयातींमध्ये निवडणूक होईल.



जिल्ह्यात २१० ग्रामपंचायतींची सार्वत्रिक निवडणूक जाहीर करण्यात आली होती. यापैकी ३३ ग्रामपंचायतींची निवडणूक पूर्णतः बिनविरोध झाली. महाड तालुक्यातील आठ, म्हसळा सात, माणगाव पाच, तळा आणि पोलादपूर प्रत्येकी चार, श्रीवर्धन तीन, तर पेण आणि सुधागड तालुक्यातील प्रत्येकी एका ग्रामपंचायतीची निवडणूक बिनविरोध झाली.

२१० ग्रामपंचायतींच्या सरपंचांची थेट जनतेतून निवड होणार होती, पण चार ग्रामपंचायतींच्या सरपंचपदासाठी एकही अर्ज आला नाही. त्यामुळे तेथील सरपंचपद रिक्त राहणार आहे, तर ३८ ग्रामपंचायतींचे सरपंच बिनविरोध निवडून आले आहेत. त्यामुळे आता प्रत्यक्षात १६८ ग्रामपंचायतीच्या सरपंचपदासाठी निवडणूक होणार आहे.

अशाच प्रकारे २१० ग्रामपंचायतींच्या १८५४ सदस्यांसाठी निवडणूक होणार होती, पण ४४ जागांसाठी उमेदवारी अर्ज आले नाहीत. त्यामुळे या जागा रिक्त राहणार आहेत, तर ५६४ सदस्य बिनविरोध निवडून आले. त्यामुळे आता १२४६ सदस्यांसाठी निवडणूक होईल.

जिल्ह्यातील १६८ सरपंचपदासाठी ४८५ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. १२४६ सदस्यपदांसाठी ३३९५ उमेदवार रिंगणात उरले आहेत. सदस्य व सरपंचपदासाठी येत्या ५ नोव्हेंबर रोजी मतदान होईल

दरम्यान, मतदानाला आता काहीच दिवस उरल्याने प्रचार अंतिम टप्प्यात आला आहे. सर्व पक्ष आपापल्या परीने ताकद लावत आहेत, तर दुसरीकडे प्रशासनाकडून मतदानप्रक्रियेसाठी तयारी सुरू झाली आहे. या निवडणुकीचा निकाल ६ नोव्हेंबरला लागेल.

## माथेरानची मिनिट्रेन उद्यापासून पुन्हा धावणार!

**माथेरान : रामप्रहर वृत्त**

पावसाळा संपल्यानंतर नेरळ-माथेरान पॅसेंजर मिनिट्रेन पुन्हा सुरू करण्याचा निर्णय मध्य रेल्वेने घेतला आहे. ४ नोव्हेंबरपासून पर्यटकांना या गाडीतून सफर करता येणार आहे.

आबालवृद्धांची आवडती मिनिट्रेन नागमोडी वळणे घेत हिरव्यागार वनराईतून, डोंगरदाऱ्यांमधून शिळ गुंजवत धावत असते. सुरक्षिततेच्या दृष्टीने पावसाळ्यात केवळ अंतर्गत लोकलसेवा उपलब्ध असते. पर्यटकांना माथेरान घाटमार्गाची मजा देणारी मिनिट्रेन या वर्षी दहा दिवस उशिराने पर्यटकांच्या सेवेत येत आहे. दरवर्षी दसऱ्याच्या मुहूर्तावर ही मिनिट्रेन सुरू होते. घाटमार्गात कामे पूर्ण केल्यानंतर ४ नोव्हेंबरपासून मिनिट्रेन पर्यटकांसह प्रवाशांच्या सेवेत येणार आहे.



दररोज दोन फेऱ्या अप आणि डाऊन असणार आहेत. सहा बोगी असलेल्या पॅसेंजर ट्रेनमध्ये तीन बोगी द्वितीय श्रेणीच्या, एक प्रथम श्रेणी आणि दोन लगेज बोगी असणार आहेत.

> **नेरळ-माथेरान मार्गावर ४ नोव्हेंबरपासून मिनिट्रेन धावणार आहे. तसे प्रसिद्धीपत्रक जारी केले आहे. पर्यटनासाठी प्रवाशांनी या सेवेचा लाभ घेऊन आनंद लुटावा.**
> **-डॉ.शिवराज मानसपुरे, मुख्य जनसंपर्क अधिकारी**

### विस्ताडोमची मजा

नेरळ-माथेरान या २१ किलोमीटर रेल्वेमार्गावर विस्ताडोम असणार आहे. सकाळी ८.५०च्या ट्रेनला ही बोगी लावली जाणार आहे, जी दोन्ही बाजूने काचेची व वरील टॉपसुद्धा काचेचा असल्यामुळे पर्यटकांना या मार्गावर बोगीतूनच निसर्गाचा मनमुराद आनंद घेता येणार आहे.

### असे आहे वेळापत्रक

- **नेरळ ते माथेरान सकाळी ८.५० व १०.२५ वाजता**
- **माथेरान ते नेरळ दुपारी २.४५ व सायंकाळी ४ वाजता**

### आमदार अपात्रतेसंदर्भात २१ नोव्हेंबरपासून नियमित सुनावणी

**मुंबई : प्रतिनिधी**

शिवसेना आमदार अपात्रतासंदर्भात विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्यासमोर गुरुवारी (दि. २) सुनावणी झाली. या प्रकरणाची कागदपत्रे १६ नोव्हेंबरपर्यंत सादर करावी लागणार आहे. त्यानंतर २१ नोव्हेंबरपासून नियमितपणे सुनावणी होणार आहे.

सुनावणीवेळी शिंदे गटाच्या १६ आमदारांना ई-मेलच्या माध्यमातून व्हिप बजावण्यात आला होता, असा दावा ठाकरे गटाने केला, पण ज्या ई-मेलवर व्हिप पाठवण्यात आला होता ते आपले नसल्याचा दावा शिंदे गटाच्या वकिलांनी केला. व्हिपच मिळाला नसल्याने त्याचे उल्लंघन केले असा अर्थ होत नाही, असाही युक्तिवाद करण्यात आला.



**पनवेल : साप्ताहिक पनवेल टाईम्सचा वर्धापन दिन नुकताच उत्साहात झाला. या सोहळ्याला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार होते, मात्र व्यस्त कार्यक्रमांमुळे त्यांना या सोहळ्यास उपस्थित राहता आले नाही. म्हणून 'पनवेल टाईम्स'चे संपादक गणेश कोळी यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांची गुरुवारी भेट घेत त्यांचा सन्मान केला. सोबत माजी उपनगराध्यक्ष मदन कोळी होते.** (छाया : विकास म्हात्रे)

# मुंबईतील ३५० बसगाड्यांवर हवा शुद्धीकरण यंत्रे बसविणार

## महापालिकेचा निर्णय, आणखी सहा उपाययोजना

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईचा कोंडलेला श्वास मोकळा करून मुंबईकरांना शुद्ध हवा उपलब्ध व्हावी, यासाठी मुंबई महानगरपालिकेने महत्त्वाची पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. मुंबईत धावणाऱ्या ३५० बेस्टच्या बसगाड्यांवर हवा शुद्धीकरण यंत्रे बसविण्यात येणार असून, सहा उपाययोजना करण्यात येणार आहेत.



गेल्या अनेक दिवसांपासून मुंबईतील हवेचा दर्जा खालावला आहे. मुंबईत सुरू असलेली विकासकामे, इमारतींची बांधकामे, वाहनांचा धूर, कारखान्यातून निघणारा धूर आदींमुळे मुंबईकरांना श्वास घेणे अवघड झाले आहे. महागरपालिकेने बांधकाम व्यावसायिकांसह संबंधितांना मार्गदर्शक सूचनाही केल्या आहेत, मात्र या उपाययोजनांचा अद्याप फारसा प्रभाव पडला नसल्याचे दिसून येत आहे.

त्यामुळे हवा शुद्धीकरणासाठी पालिकेने आणखी उपाययोजना करण्याचा निर्णय घेतला आहे. हवा प्रदूषण रोखण्यासाठी पालिका आयआयटी, मुंबईची मदत घेणार आहे.

आयआयटीकडून हवा शुद्धीकरणासाठी प्रायोगिक तत्त्वावर सहा यंत्रे मागविण्यात येणार आहेत. मुंबईत धावणाऱ्या ३५० बसगाड्यांवर हवा शुद्धीकरण यंत्रे बसविण्यात येणार असून, यापैकी १५० बसगाड्यांवर ही यंत्रे बसविण्यात आली आहेत, अशी माहिती मुंबई शहर पालकमंत्री दीपक केसरकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

वायू या कंपनीने तयार केलेले पदपथावरील दिवे ५० ठिकाणी कार्यान्वित केले जाणार असून, या दिव्यांमध्ये हवा शुद्धीकरण यंत्रणा बसविण्यात आली आहे. चेंबूर येथील डायमंड गार्डन, वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान येथे हे दिवे बसवले जाणार आहेत.

### चौक गावातील वाहतूक कोंडीमुळे नागरिक हैराण

**चौक : प्रतिनिधी**

चौक गावात रस्त्याच्या कडेला ठेवण्यात आलेल्या बांधकाम साहित्यामुळे वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागत आहे. गावातून जाणारी एकमेव एसटीही या कोंडीत अडकल्याने प्रवाशांचे हाल झाले.

चौक बाजारपेठेला गेली अनेक वर्षे वाहतुकीचे ग्रहण लागले असून ते सुटण्याची शक्यता कमीच आहे. अनधिकृत बांधकाम, बेशिस्त वाहतूक पार्किंगने व्यापारी, ग्रामस्थ त्रस्त झाले आहेत. वाहतूक कोंडी सोडविताना पोलिसांचीही दमछाक होते. पनवेल-खोपोली, कर्जत-पनवेल, खोपोली-पनवेल, पेण-कर्जत या गाड्यांना गावात तीन थांबे होते. वाहतूक कोंडीला त्रासून या सर्व गाड्या गावच्या बाहेरून जात आहेत.



# जांबरूंग धरणाचे काम पूर्ण करण्याची मागणी

**खालापूर : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यात १९८०मध्ये मंजूर करण्यात आलेले जांबरुंग धरणाचे काम अद्यापही पूर्ण झालेले नाही. गेल्या ४५ वर्षांपासून रखडलेले धरणाचे काम २०२४मध्ये तरी पूर्णत्वास जाईल का असा सवाल केळवली-डोलवली रेल्वेपट्ट्यातील नागरिक विचारत आहेत.



स्थानिक आमदार महेंद्र थोरवे यांनी मे २०२२मध्ये जांबरुंग केळवली परिसरातील नागरिकांची मंत्रालयात पाटबंधारे मंत्र्यांसमोर बैठक घेऊन हे धरण कुठल्याही परिस्थितीत २०२३मध्ये पूर्ण करण्यात येईल. त्यासाठी लागेल तो हातभार लावण्याचे आश्वासन जांबरुंग परिसरातील रहिवासी यांना दिले होते. आमदारांनी व मंत्र्यांनी आदेश देऊनही ठेकेदार काम सुरू करीत नसल्याने रेल्वेपट्ट्यातील नागरिक हताश झाले आहेत.

या ठेकदारास काळ्या यादीत टाकावे, अशी मागणी ग्रामस्थ करीत आहे.

याबाबत लघु पाटबंधारे विभागाचे आण्णासाहेब कदम व विलासराव देशमुख यांना विचारणा केली असता, आम्ही ठेकेदार सुनील मुंदडा यांना फोनवरून संपर्क केला असून ते येत्या आठ दिवसात काम सुरू करतील असे सांगितले आहे. ठेकेदाराची देयके देणे बाकी असून काम सुरू केले तरच मागील देयके देण्यात येतील. काम सुरू करण्याच्या आम्ही कसोशीने प्रयत्न करीत आहोत, असे सांगितले.

**शासनाच्या तिजोरीवर भार**

***या धरणाच्या निर्मितीने १८१ हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार असल्याने या भागाचा विकास होण्यास मदत होणार आहे. १९८० साली मंजूर झालेल्या या धरणासाठी ४९ लाख २० हजार ८७१ रुपये खर्चाची योजना ४३ वर्षात तब्बल ९१ कोटीच्या घरात पोहचली असून लघुपाटबंधारे अधिकारी व ठेकेदाराच्या उदासीनतेमुळे शासनाच्या तिजोरीवर तब्बल २०० पटीने भार पडणार आहे.***

# सुप्रिया सुळेंनी आम्हाला सल्ला देऊ नये -खासदार सुनील तटकरे

**अलिबाग : प्रतिनिधी**

कुणी कुणाला फसवले, कुणी कुणाला नाही फसवले हे वेगवेगळ्या वेळच्या वेगवेगळ्या घटनांमधून समोर आलेय. त्यामुळे संसदरत्नांनी आम्हाला सल्ला देण्याच्या भानगडीत पडू नये, असा टोला राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांना लगावला आहे.



भाजप आणि फडणवीस यांनी ठाकरेंशी दगाफटका केला, आता एकनाथ शिंदे यांच्याशीदेखील दगाफटका करताहेत तेव्हा अजित पवार गटानेदेखील सावध रहावे, असा सल्ला सुप्रिया सुळे यांनी दिला आहे. त्यावर खासदार तटकरे बोलत होते. खासदार सुप्रिया सुळे यांनी देवेंद्र फडणवीस यांच्यावर काय टीका केली त्याचे उत्तर द्यायला भाजप समर्थ आहे. आम्ही उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली ठाम भूमिका घेतली आहे आणि यापुढेही घेत राहू. आम्हालाही थोडे फार राजकारण कळते अजिबातच कळत नाही असे नाही, अशा शब्दांत खासदार सुनील तटकरे यांनी खासदार सुप्रिया सुळे यांना सुनावले.

शिर्डी येथील कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शरद पवार यांच्यावर केलेल्या टीकेवर बोलण्यास तटकरे यांनी नकार दिला मात्र यावर आपण योग्य वेळी बोलू असेही त्यांनी स्पष्ट केले.

### पुण्यात मेफेड्रॉनच्या विक्रीसाठी आलेल्या चौघांना अटक

**पुणे** : लष्कराच्या दक्षिण मुख्यालयाचे इंटेलिजन्स युनिट आणि गुन्हे शाखेच्या अमली पदार्थविरोधी पथकाने संयुक्तपणे शुक्रवार पेठ परिसरात छापा टाकून दोन लाख १४ हजार रुपये किमतीचे मेफेड्रॉन (एमडी) जप्त करून चौघांना अटक केली आहे.

रोनित खाडे (वय १९, रा. सिंहगड रस्ता, हिंगणे), चैतन्य सावले (वय २७, रा. किरकटवाडी), सार्थ खरे (वय १९, रा. आनंदनगर, सिंहगड रस्ता), विशाल मेहता (वय १९, रा. सिंहगड रस्ता) यांना अटक करण्यात आली आहे.

### कर्जतमधील कशेळेत झाले दुर्मीळ निल गाईचे दर्शन

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील कशेळे भागात निल गाईचे दर्शन येथील स्थानिकांना झाले. दुर्मिळ प्रजातीमध्ये मोडणाऱ्या या प्राण्यांचे जतन करण्यासाठी, त्यांची संख्या वाढवण्यासाठी तसेच त्यांची शिकार रोखण्यासाठी म्हणून वन विभागाने पुढाकार घ्यावा, अशी मागणी आता प्राणीप्रेमींकडून करण्यात येत आहे.

सध्या कशेळे येथील शबरी आश्रम परिसरात काही तरुणांना नील गायचे दर्शन झाले. त्यामुळे अशा दुर्मिळ प्रजातीचे जतन करण्यासाठी त्यांची संख्या वाढवण्यासाठी वनविभागाने पुढाकर घेतला पाहिजे म्हणून प्राणी प्रेमीकडून मागणी होत आहे.

बारा ज्योतीलिंगांपैकी असलेल्या भीमाशंकर अभयरण्यामुळे पर्यटनाला चालना देणारा या तालुक्यात आता दुर्मिळ असे वन्य जीव सापडत आहेत. यापैकीच एक असलेली निल गाय या तालुक्यात दिसून आली.

# रोह्याच्या शाळांचा राज्यस्तरावर सन्मान

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा नगर पालिकेच्या प. पू. पांडुरंगशास्त्री आठवले विद्यामंदिर आणि चिंतामणराव देशमुख माध्यमिक शाळेचा राज्यस्तरावर स्वच्छता मॉनिटर्स बनून उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल सन्मान करण्यात आला. या उपक्रमात राज्यातील नोंदणीकृत ६४ हजार १९८ शाळांमध्ये प्रभावी ठरलेल्या रोहा नगर पालिकेच्या दोन शाळांचा गौरव मंगळवारी (दि. ३१) मुंबई येथे आयोजित कार्यक्रमात केला गेला.




या वेळी शालेय शिक्षणमंत्री केसरकर, प्रधान सचिव रणजितसिंह देओल, सहसचिव इम्तियाज काझी, ज्येष्ठ अभिनेते प्रेम चोप्रा, प्रकल्प संचालक रोहित आर्या, शरद नयनपल्ली उपस्थित होते. रायगड जिल्ह्यातील प्रभावी कामगिरी केलेल्या प. पू. पांडुरंगशास्त्री आठवले विद्यामंदिर आणि चिंतामणराव देशमुख माध्यमिक शाळेसह राज्यातील १०० शाळांना आणि ३०० निवडक विद्यार्थ्यांना महाराष्ट्र स्वच्छता मॉनिटर ओळखपत्राने गौरविण्यात आले.

स्वच्छता मॉनिटर उपक्रमात सहभागी झालेल्या शाळेच्या मुख्याध्यापिका नम्रता पानसरे आणि वर्गशिक्षकांनी विद्यार्थ्यांना स्वच्छता मॉनिटर बनवून जागोजागी बेफिकीर लोकांना थांबविण्यास प्रोत्साहित केले.

# सानपाडावासीयांना आता मिळणार हक्काचा तलाव

## नवी मुंबई महानगरपालिकेने सिडकोकडे केली मागणी

**नवी मुंबई : बातमीदर**

सानपाडा ग्रामस्थांना मूर्ती विसर्जन व धार्मिक विधिकरिता पारंपरिक खोकड तलावाशिवाय अन्य पर्याय नसल्याने रहिवाशांना महामार्ग ओलांडून प्रवास करावा लागत आहे. याकरीता माजी नगरसेवक सोमनाथ वास्कर हे पाठपुरावा करीत होते. अखेर त्यास यश आले असून पालिकेने सिडकोकडे तलावासाठी सानपाडा अंडरपासजवळील लोहमार्गामधील सुमारे १० हेक्टर भूखंड उद्यान मैदान व तलावासाठी देण्याची मागणी केली होती, तसे मागणी पात्र पालिकेने सिडकोकडे केली आहे. त्याविषयी लवकरच बैठकीत निर्णय होणार आहे.

आमदार मंदा म्हात्रे यांच्या सहकार्याने सिडको व्यवस्थापकीय संवालकांसोबत झालेल्या बैठकीत सानपाडा अंडरपासजवळील लोहमार्गामधील सुमारे १० हेक्टर भूखंड नवी मुंबई मपालिकेस उद्यान मैदान व तलाव या प्रायोजनार्थ हस्तांतरीत करावा अशी लेखी सूचना लोकप्रतिनिधींनी केली होती.

व्यवस्थापकीय संचालकांनी सदर सुचना मान्य केली होती. त्यानुसार १८ जुलै २०२३ रोजी तत्कालीन प्रशासन उपायुक्तांनी सिडकोला भुखंड मागणी पत्र दिले होते. त्यास सिडको व नवी मुंबई पालिकेसोबत जलेल्या संयुक्त बैठकीत हा विषय मार्गी लागेल असे आश्वासन आयुक्तांनी दिले असल्याने सानपाडा ग्रामस्थांचा तलावाचा प्रश्न सुटणार आहे.

# मोबाईल चोरणाऱ्या त्रिकुटापैकी एकाला अटक

**पनवेल : वार्ताहर**

चेंबूर येथे जाण्याच्या बहाण्याने टॅक्सी चालकाचा मोबाईल खेचून पळून जाण्याच्या प्रयत्नात असलेल्या तिघांपैकी एकाला पकडून पोलिसांच्या स्वाधीन केले आहे. सिद्धेश्वर गजे (वय २३) असे या आरोपीचे नाव असून पनवेल शहर पोलीस त्याच्या इतर दोघा सहकाऱ्यांचा शोध घेत आहेत.

कळंबोली येथे राहणारे सिद्धेश्वर गजे, त्याचे सहकारी अक्षय गुंड (वय २६) व सागर गर्जे (वय २१) तिघेही दुचाकीवरून फिरत होते. ओरियन मॉलसमोरील बाजूला एक ओलाचालक कारमध्ये झोपल्याचे पाहून या त्रिकुटाने संतू घोष (वय ४०) याला चेंबूर येथे जाण्याच्या बहाण्याने उठवले. त्यानंतर एकाने कारमध्ये बसण्याचा बहाणा केला. संधी साधून ओला चालकाचा २० हजार रुपये किमतीचा मोबाईल खेचून पलायन केले.

संतू घोष याने लुटारूंचा कारने पाठलाग करून अडवण्याचा प्रयत्न केला, मात्र त्याने पळ काढल्याने घोष याने आरडाओरड केला. त्यामुळे तिघांपैकी एकाला पकडण्यात यश आले.

पान १ वरुन

## प्रत्येक निवडणुकीत भूमिका बदलणाऱ्या शेकापच्या जयंत पाटलांनी पक्षनिष्ठा शिकवू नये!

२०१९च्या लोकसभा निवडणुकीत माझ्या विजयात शेकाप आणि काँग्रेसची मोठी भूमिका होती हे मी नाकारत नाही, पण विधानसभेत शेकापच्या पराभवाला मी जबाबदार आहे तर ते मी मान्य करणार नाही. विधानसभा निवडणुकीत अलिबागमध्ये काँग्रेसचा उमेदवार असावा असा जयंत पाटील यांचा आग्रह होता, पण काँग्रेसमध्ये बंडखोरी झाल्याने त्यांचे निवडणुकीतील गणित फसले. त्या वेळी मला अलिबागमध्ये प्रचाराला येण्याची गरज नाही असेही पक्षाच्या नेत्यांनी सांगितले होते. त्यामुळे या मतदारसंघातील पराभवाचे खापर माझ्यावर फोडणे चुकीचे असल्याचे तटकरेंनी नमूद केले.

महाराष्ट्रात भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस असे तीन पक्ष महायुती म्हणून एकत्र काम करीत आहोत. आगामी लोकसभा निवडणुकीत आम्ही महायुती म्हणूनच निवडणूक लढवणार आहोत. ४५ प्लस हे आमचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी आम्ही तीन पक्ष संघटितपणे निवडणूक लढवणार आहोत. अद्याप जागावाटप झालेले नाही. जागवाटपात जर रायगड लोकसभा मतदारसंघ राष्ट्रवादी काँग्रेसच्या वाट्याला आला आणि पक्षाचे अध्यक्ष अजित पवार यांनी मला निवडणूक लढविण्याचे आदेश दिले तर मी रायगड लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवेन तसेच जर रायगड लोकसभा मतदारसंघ महायुतीतील अन्य कुठल्याही पक्षाच्या वाट्याला गेला तर त्यांच्या उमेदवाराला निवडून आणण्यासाठी पूर्ण ताकदीने प्रयत्न करणार, असेही खासदार सुनील तटकरे यांनी या वेळी स्पष्ट केले.

### भिवंडीत कुरिअर बॉय आणि सेल्समन निघाले अट्टल चोरटे

**भिवंडी : प्रतिनिधी**

भिवंडी शहरामध्ये मागील काही दिवसांपासून सोनसाखळी चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाल्याचे चित्र आहे. त्यामुळे पोलिसांना आपापल्या क्षेत्रामध्ये गस्त वाढवून नाकाबंदी करण्याचे आदेश दिले होते. पोलिसांच्या या कारवाईला यश आले असून भिवंडी शहर पोलीस ठाण्यातील गणेश हरणे आणि लहू गावित या दोघा पोलिसांनी पाठलाग करून चोरट्यांना पकडले.

सोनू गोविंद पाल आणि कमलाकर गणपत डोंगरे अशी या चोरट्यांची नावे आहेत. सोनू हा सेल्समन होता तर गणपत हा कुरिअर बॉयचे काम करीत होता. या चोरट्यांकडून आठ लाख ६१ हजार रुपयांचे २८ तोळे सोने आणि ५० हजारांची एक दुचाकी असा मुद्देमाल जप्त केला. एकूण नऊ गुन्हे उघडकीस आणले.



# राजभवन येथे छत्तीसगढ, मध्य प्रदेश, आंध्र प्रदेश राज्य स्थापना उत्साहात

**मुंबई : प्रतिनिधी**

एक भारत श्रेष्ठ भारत उपक्रमाचा भाग म्हणून बुधवारी (दि. १) राजभवन येथे राज्यपाल रमेश बैस यांच्या प्रमुख उपस्थितीत छत्तीसगढ, मध्य प्रदेश व आंध्र प्रदेश या तीन राज्यांचा राज्य स्थापना दिवस साजरा करण्यात आला.





या वेळी छत्तीसगड येथील चित्रोत्पला लोककला परिषद तसेच आंध्र प्रदेशातील तेलुगू कला समिती यांच्या वतीने तिन्ही राज्यांच्या लोककला व संस्कृतीचे दर्शन घडविणारा सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आला.

राज्यपाल बैस म्हणाले की, आद्य शंकराचार्यांनी संपूर्ण देशाला समान संस्कृतीच्या धाग्याने जोडण्याच्या उद्देशाने देशाच्या वेगवेगळ्या दिशांना चार मठांची स्थापना केली. धर्माचे अधिष्ठान दिल्यास नागरिक एका भागातून दुसऱ्या भागात पर्यटनाला जातील व त्यातून नव्या संस्कृतीची ओळख होईल, या उद्देशाने त्यांनी पीठांची स्थापना केली, असे नमूद करून एक भारत श्रेष्ठ भारत या उपक्रमातून प्रत्येक राज्याने इतर राज्याची संस्कृती जाणून घ्यावी, या हेतूने सुरू केल्याचे त्यांनी सांगितले.

देशभरातील सर्व राजभवनांमध्ये १ नोव्हेंबरला या एकाच दिवशी आठ राज्ये आणि पाच केंद्रशासित प्रदेशांचे स्थापना दिन साजरे करीत असल्याचे त्यांनी सांगितले. महाराष्ट्र राजभवन येथे हरियाणा, कर्नाटक, केरळ, पंजाब व तामिळनाडू तसेच पाच केंद्रशासित प्रदेशांचा स्थापना दिवसदेखील बुधवारी साजरा करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

राज्यपाल बैस यांच्या हस्ते या वेळी ज्येष्ठ तेलुगू अभिनेते सुमन तलवार, चित्रोत्पला लोक कला परिषदेचे संचालक राकेश तिवारी, तेलुगू कला समितीचे एम. के. रेड्डी आणि कुचीपुडी नृत्यांगना नादिया यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, नागपूर यांच्या माध्यमातून चित्रोत्पला लोककला परिषदेच्या वतीने छत्तीसगढ गीत, जंवारा गीत, करमा नृत्य, नाचा गीत नृत्य, फाग गीत नृत्य व मध्य प्रदेशातील कलाकारांचे कबीर गायन (माळवा शैली) सादर करण्यात आले. तेलुगू कला समितीच्या माध्यमातून नृत्यांगना नादिया यांनी कुचीपुडी नृत्य सादर केले. कार्यक्रमाला राज्यपालांचे विशेष सचिव विपीन कुमार सक्सेना, राज्यपालांच्या प्रभारी सचिव श्वेता सिंघल व परिवार प्रबंधक अरुण आनंदकर तसेच छत्तीसगढ, मध्य प्रदेश व आंध्र प्रदेश येथील कलाकार व निमंत्रित उपस्थित होते.

# भाजप महायुतीच्या उमेदवारांना विजयी करा

## आमदार प्रशांत ठाकूर यांचे भिंगार ग्रामपंचायतीच्या प्रचारसभेत आवाहन







(छाया : संकेत भोईर)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यामध्ये ग्रामपंचायत निवडणुकीची धामधूम सुरू आहे. भिंगार ग्रामपंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमिवर मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारसभेचे बुधवारी (दि. १) आयोजन करण्यात आले होते. आमदार प्रशांत ठाकूर यांनी, परिसराच्या विकासासाठी भाजप महायुतीच्या उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन या वेळी केले.

या निवडणुकीमध्ये थेट सरपंचपदासाठी गुलाब रामदास वाघमारे तर सदस्यपदासाठी प्रभाग क्रमांक १ मधून अतुल मधुकर कातकरी, अशोक राजाराम गायकर, शामल महेश लहाणे, प्रभाग क्रमांक २ मधून सुनील नारायण पाटील, उज्ज्वला अबाजी वाघमारे, रिना राजेश पाटील, प्रभाग क्रमांक ४ मधून सुभाष जेठू पाटील, करीना संदेश पाटील, आशा नितीन वाघमारे उभे आहेत. या उमेदवारांच्या प्रचारार्थ सभेचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी राजेंद्र पाटील, शेडुंग गावचे माजी सरपंच रामदास दत्तू खेत्री, माजी ग्रामपंचायत सदस्य विठ्ठल दुर्गे, मोहन दुर्गे, सुनील पाटील, रीना पाटील, सुनील पाटील, भाजप कार्यकर्ते प्रकाश खेत्री, गजानन दुर्गे, जनार्दन खेत्री, गोविंद दुर्गे, ज्ञानेश्वर खेत्री, अरुण खेत्री, राजेश पाटील, संजय पाटील, विकास मुंडे, आत्माराम लबडे, संतोष पाटील, गजानन पाटील, माजी सरपंच निवृत्ती शेंद्रे, माजी सरपंच निलेश पवार, ज्ञानेश्वर पाटील, सुनील नारायण पाटील, रिना पाटील, उज्ज्वला वाघमारे, गुलाब वाघमारे, अशोक गायकर, अतुल कातकरी, शामल लहाने यांच्यासह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जातीपातीच्या राजकारणापेक्षा विकासाचे राजकारण करा

## आमदार महेश बालदी यांचे चिरनेरमध्ये प्रतिपादन

**उरण : प्रतिनिधी**

जात, पात, धर्म, पंथ भेदाचे राजकारण करू नका, तर विकासाचे राजकारण करा. परिवर्तनाच्या विकासाची आज गरज आहे, असे प्रतिपादन आमदार महेश बालदी यांनी केले. ते गुरुवारी (दि. २) चिरनेर येथील सभेत बोलत होते.

उरण तालुक्यातील चिरनेर ग्रामपंचायतीमध्ये भाजपचे थेट सरपंचपदाचे उमेदवार प्रतिक गोंधळी आणि सदस्यपदाचे उमेदवार रमेश फोफेरकर, सुशील पाटील, अंकित म्हात्रे, समीर डुंगीकर, अजिंक्य ठाकूर, रमेश गोंधळी, सीताराम कातकरी, अश्विनी कातकरी, प्रणोती पाटील, सरिता खारपाटील, अश्विनी नारंगीकर, वनश्री खारपाटील, मेघा चिरलेकर यांच्या प्रचारार्थ भाजप मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांच्या उपस्थितीत जाहीर प्रचार सभेचे आयोजन करण्यात आले होते. त्या वेळी ते बोलत होते.

या सभेस भाजपचे ज्येष्ठ नेते पी. पी. खारपाटील, उरण तालुका अध्यक्ष रविशेठ भोईर, भाजप नेते राजेंद्र खारपाटील, उरण शहराध्यक्ष कौशिक शाह, महिला मोर्चा तालुका अध्यक्ष राणी म्हात्रे, संजीवकुमार भगत, उद्योजक अरुण भगत, भाजपचे शशिकांत पाटील, माजी उपसरपंच प्रियांका गोंधळी, धनंजय गोंधळी, सुशांत पाटील आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते.

आपल्या भाषणात आमदार महेश बालदी म्हणाले की, परिवर्तन आणि विकास भारतीय जनता पक्षच घडवू शकतो, कारण भाजप केंद्रात व राज्यात सत्तेवर आहे. मागील विधानसभा निवडणुकीत या गावासाठी मी पाच कोटी रुपयांचा निधी आणून दिला हे चिरनेरकरांना ठावूक आहे. आता तर आम्ही दोन आमदार आहोत. चिरनेर गावासाठी अजून तीन कोटींचा निधी उपलब्ध करून देणार आहे. निधी आणण्याची धमक आमच्यात आहे. चिरनेर गावाचा चेहरामोहरा बदलायचा असेल, तर या निवडणुकीत सरपंचपदाचे उमेदवार प्रतीक गोंधळी आणि त्यांच्या सदस्यपदाच्या सहकारी उमेदवारांना बहुमताने विजयी करा. या गावाचे नंदनवन बनवू. पुढे बोलताना त्यांनी स्वार्थासाठी एकत्र आलेल्या पक्षांमध्ये निधी आणण्याची धमक आहे का, असा खडा सवाल विरोधकांना केला.

आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, चिरनेर ही क्रांतिकारकांची भूमी आहे. येथे विकासात्मक परिवर्तनासाठी भारतीय जनता पक्षाला आपले अमूल्य मत द्या. आम्ही दोन्ही आमदार या गावाच्या विकासासाठी भावी सरपंच प्रतीक गोंधळी यांच्या पाठिशी उभे राहून या गावाचा विकास साधण्याचा प्रयत्न करू.

येथील आदिवासी बांधव वीज, पाणी यांसारख्या मूलभूत सुविधांपासून वंचित आहेत. त्यांना येथील गाव पुढाऱ्यांनी विकासापासून वंचित ठेवले आहे. येथे खऱ्या अर्थाने विकास करायचा असेल तर भाजपशिवाय पर्याय नाही. आदिवासी बांधवांच्या परिपूर्ण विकासासाठी मी कटिबद्ध आहे. त्यांच्याकरिता चार हजार घरकुलांची तरतूद केली आहे, याची पूर्तता लवकरच होईल. विरोधकांनी कोणता भरीव विकास केला ते दाखववा. फक्त घोषणा करण्यात ते पटाईत आहेत. श्री महागणपतीच्या आशीर्वादाने प्रतीक गोंधळी आणि त्यांच्या सहकारी उमेदवारांना नक्कीच यश येईल.

या सभेस भाजपचे कार्यकर्ते समीर खारपाटील, सागर खारपाटील, करण पाटील, स्वप्नील पाटील, संजय गोंधळी, संताजी गोंधळी, प्रकाश गोंधळी, नमस्ते मोकल, सुधीर पाटील, सुजित पाटील, नारायण गोंधळी, योगेश खारपाटील, संदीप गोंधळी, जयेश खारपाटील, स्वप्नील खारपाटील, अनिकेत गोंधळी, बबन गोंधळी, नितीन गोंधळी, सुहास गोंधळी, शेखर गोंधळी यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.









**पनवेल : खारघरमध्ये नव्याने ॐ ब्लकानेर स्वीट्स अ‍ॅण्ड फरसाण दुकानाचे उद्घाटन महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते गुरुवारी झाले. परेश ठाकूर यांनी दुकानाचे मालक टीकम सीरवी यांचे अभिनंदन करीत त्यांना पुढील वाटचालीकळीता शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपचे उत्तर रायगड व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष कमल कोठारी, माजी नगरसेवक बबन मुकादम, कळंबोली शहर अध्यक्ष रविनाथ पाटील, धनाराम सीरवी, राम सीरवी, कालूराम सीरवी, ताराराम सीरवी आदी उपस्थित होते.** (छाया : अक्षय शार्दुल)





## भाजप महायुतीची प्रचार रॅली

**पनवेल : तालुक्यात ग्रामपंचायत निवडणूक होत आहे. विचुंबे येथील निवडणुकीत भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी, मनसे आणि रिपाइं महायुतीच्या थेट सरपंचपदाचे उमेदवार प्रमोद भिंगारकर तसेच सदस्यपदासाठी प्रभाग क्रमांक १मधून निकिता म्हात्रे, श्याम म्हात्रे, संदीप पाटील; प्रभाग २मधून ज्योती भोईर, कंकेश गोंधळी, प्रितेश भिंगारकर; प्रभाग ३मधून श्रावणी भोईर, प्रगती गोंधळी, अनिल भोईर; प्रभाग ४मधून विभुती सुरते, आरती गायकवाड, नितीन भोईर आणि प्रभाग ५मधून भाग्यश्री भोईर, भावना साधू, अनंता गायकवाड उभे आहेत. त्यांच्या प्रचारार्थ रॅली काढण्यात आली होती. या वेळी भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, माजी जि. प. सदस्य अमित जाधव, शिवकर सरपंच आनंद ढवळे, सुकापूर सरपंच राजेश पाटील, सचिन पाटील, राम पाटील, पवन भोईर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.**

# दिघोडे ग्रामपंचायत निवडणुकीत ग्रामविकास आघाडीचा जोरदार प्रचार



**उरण : रामप्रहर वृत्त**

तालुक्यातील दिघोडे ग्रामपंचायतीची सार्वत्रिक निवडणूक येत्या ५ नोव्हेंबर रोजी होणार आहे. माजी सरपंच सोनिया मयूर घरत यांच्या मागील पाच वर्षांच्या कार्यकाळात गावात विविध विकासकामे झाली. यामुळे या वेळीदेखील भाजप-शिवसेना-राष्ट्रवादीच्या ग्रामविकास आघाडीला पुन्हा एकदा ग्रामस्थ संधी देतील, असा दावा कार्यकर्त्यांनी केला आहे.

या वेळी ग्रामविकास आघाडीचे थेट सरपंचपदाचे उमेदवार मयूर घरत, प्रभाग १मधून रितेश लक्ष्मण कोळी, ललिता जगदीश कोळी, रुपाली रोहन कोळी, प्रभाग २मधून निलेश बामा पाटील, पूजा अभिजित पाटील, श्रद्धा गणेश म्हात्रे, प्रभाग ३मधून समीर गजानन ठाकूर, लक्ष्मी हरजीवन ठाकूर, पूजा संदिप पाटील यांच्यासमोर काँग्रेस-शेकाप अशी लढत आहे.

मागील पाच वर्षांच्या सोनिया घरत यांच्या ग्रामविकास आघाडीच्या माध्यमातून विविध विकासकामे झाली आहेत. या विकासकामांमुळेच ग्रामविकास आघाडीचे थेट सरपंचपदाचे उमेदवार मयूर घरत यांच्यासह इतर उमेदवारांना मतदारांचा उत्तम प्रतिसाद लाभत आहे. बुधवारी (दि. १) काढण्यात आलेल्या ग्रामविकास आघाडीच्या प्रचार रॅलीला मतदारांचा प्रचंड प्रतिसाद लाभला होता.

रॅलीमध्ये भाजप जिल्हा उपाध्यक्ष निळकंठ घरत, प्रसाद पाटील, अजित पाटील, काशीनाथ पाटील, रमण कासकर, माजी शिवसेना शाखाप्रमुख अनिल पाटील, प्रल्हाद कासकर, अश्विन पाटील, प्रदीप पाटील आदींसह ग्रामविकास आघाडीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कोजागरी पौर्णिमेनिमित्त कोमसापचे कविसंमेलन रंगले

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कोकण मराठी साहित्य परिषद पनवेल शाखा व के. गो. लिमये सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालय पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने कोजागिरी पौर्णिमेनिमित्त वाचनालयाच्या सभागृहात खुले कविसंमेलन आयोजित केले होते. या कवी संमेलनाच्या अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिका अ‍ॅड. सुनिता जोशी होत्या, तर प्रमुख पाहुणे ज्येष्ठ गझलकार अे. के. शेख होते. कविसंमेलनात २५ कवींनी सहभाग घेतला. या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कवी सुभाष कुडके यांनी केले.

ज्येष्ठ गझलकार दिवाकर वैशंपायन यांनी आपली गझल सादर केली. सागर सोनावणे या तरूण कवीच्या प्रत्येक शब्दाला रसिकांनी दाद दिली. शिवाजी मोटे यांनी आपली गवळण खड्या आवाजात सादर केली. उरणचे कवी अरुण म्हात्रे यांनी सुरेल आवाजात भक्तिभावाने साईस्तवन सादर केले.

डॉ. अविनाश पाटील यांनी राजकारणावर मार्मिक टिपणी केली. गुणवंत पाटील, पी. जी. ठाकूर, मनोज उपाध्ये, भ. पो. म्हात्रे, नागनाथ डोलारे, योगेश ठोंबरे, प्रशांत राजपूत, काशिनाथ जाधव, कुडके या कवींनी आपल्या कविता सादर करून कविसंमेलनात विविध रंग भरले. शेवटी रेखा सोनावणे यांनी सर्व कवींचे, रसिकांचे व संयोजकांचे आभार मानले.







**उलवे नोड : आरामस को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी, प्लॉट नंबर ८७, सेक्टर २१ या सोसायटीला पिण्याच्या पाण्याची कमतरता आहे. यामुळे सिडकोकडून ग्रुपचे एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर ऋषिकेश नाईक तसेच अथॉरिटी इंजिनियर यांच्याशी चर्चा करून व कायदेशीर परवानगी घेऊन गुरुवारी नवीन पाईपलाईनच्या कामाचा शुभारंभ सोसायटी चेअरमन शरद खारकर यांच्या हस्ते करण्यात आला. या वेळी सोसायटी सेक्रेटरी बालमोहन, बिंदू नायर ट्रेझरर, कमिटी मेंबर विजय खारकर, राजकुमार खत्री तसेच अजित मोहिते, ज्योत्स्ना पाटील, भवानी प्रसाद, आर. सी. पिल्ले, दीपक उपर इतर सदस्य उपस्थित होते.**

## संपादकीय


# ‘इंडिया’ आघाडीला तडे?

येत्या महिनाभरात देशातील पाच राज्यांमध्ये विधानसभा निवडणुका होणार असून या निवडणुकांकडे पुढील वर्षीच्या लोकसभा निवडणुकांपूर्वीची पूर्वपरीक्षा म्हणून पाहिले जात आहे. विरोधकांच्या ‘इंडिया’ आघाडीच्या स्थापनेनंतर या विधानसभा निवडणुका भाजपला जड जाऊ शकतील असा सूर लावला जात होता, परंतु प्रत्यक्षात मात्र विरोधकांचे ऐक्याचे प्रयत्न अपयशी ठरू लागल्याचेच चित्र आता समोर येऊ लागले आहे.

**मध्य प्रदेशसह पाच राज्यांमधील विधानसभा निवडणुकांमुळे सध्या देशातील राजकीय वातावरण तापू लागले आहे. या विधानसभा निवडणुकांना पुढील वर्षी होणाऱ्या लोकसभा निवडणुकीमुळे आगळे महत्त्व प्राप्त झाले असून लोकसभा निवडणुकांपूर्वीची राजकीय पक्षांची पूर्वपरीक्षा म्हणून या विधानसभा निवडणुकांकडे पाहिले जाते आहे आणि खरोखरच या विधानसभा निवडणुकांमध्ये आपले ऐक्य दाखवण्याची संधी विरोधकांच्या ‘इंडिया’ आघाडीला होती, परंतु प्रत्यक्षात मात्र हे ऐक्य साकारताना काही दिसत नाही. या पाच राज्यांपैकी मध्य प्रदेशात काँग्रेस पक्ष भारतीय जनता पक्षाच्या हातातून सत्ता हिसकावून घेऊ शकेल असे भास काही विरोधी नेतेमंडळींना होऊ लागले होते, पण गेल्या काही दिवसांत मात्र वेगळेच चित्र समोर येऊ लागले आहे. मध्य प्रदेशातील जागावाटपावरून समाजवादी पक्ष आणि काँग्रेसमध्ये मतभेद झालेच. त्यात आता बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनीही मध्य प्रदेशमध्ये निवडणुका लढवण्याचा निर्णय घेतलेला दिसतो आहे. नितीश कुमार यांनी मध्य प्रदेशातील विधानसभा निवडणुकीसाठी पाच उमेदवारांची घोषणा केली आहे, पण नितीश कुमार यांचा जनता दल युनायटेड पक्ष मध्य प्रदेशात ज्या पाच जागांवर निवडणूक लढवणार आहे त्या मतदारसंघांमध्ये काँग्रेसने आपल्या उमेदवारांची आधीच घोषणा केलेली आहे. त्यामुळे तिथे काँग्रेस आणि जेडीयू एकमेकांसमोर उभे ठाकणार असे दिसते आहे. अखिलेश यादव यांचा समाजवादी पक्षही या राज्यात निवडणुकीच्या मैदानात उतरत असून मध्य प्रदेशातील एकूण २३० विधानसभा मतदारसंघांपैकी ७० ठिकाणी आम आदमी पक्षही उमेदवार उभे करणार आहे. या साऱ्या घडामोडींमुळे इंडिया आघाडीमध्ये काय आणि किती आलबेल आहे ते चव्हाट्यावर आले आहे. त्यात गुरुवारी पाटणा येथे आयोजित राजकीय मेळाव्यात बोलताना बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी काँग्रेस पक्षावरच हल्ला चढवला. इंडिया आघाडीची कोणतीही कामे होत नसून काँग्रेसची नेतेमंडळी निव्वळ विधानसभा निवडणुकांमध्ये गुंतलेली आहेत असा उघड हल्लाबोल नितीश कुमार यांनी केला. इंडिया आघाडीबाबतची कोणतीही चर्चा या विधानसभा निवडणुका संपल्यानंतरच होईल असेही त्यांनी स्पष्ट केले. गुरुवारी पाटणा येथे सीपीआय आणि डाव्या पक्षांनी आयोजित केलेल्या रॅलीत ते सहभागी झाले होते. अखिलेश यांनीही यापूर्वीच असा सूर लावला होता. अर्थात, आपल्याला सगळ्यांना सोबत घेऊन जायचे आहे हे नमूद करायला नितीश कुमार विसरले नाहीत. वास्तविक मुंबईतील बैठकीनंतर इंडिया आघाडी जागावाटपाकडे वळणार असे चित्र निर्माण झाले होते. तसे झाले तरच लोकसभा निवडणुकांच्या प्रचारासाठी सगळ्यांना पुरेसा वेळ मिळू शकतो, पण काँग्रेसने त्याकडे दुर्लक्ष केले, शिवाय मध्य प्रदेशात इतर पक्षांसाठी जागा सोडण्याच्या दिशेनेही काहीच हालचाल केली नाही. विधानसभा निवडणुका होत असलेल्या पाच राज्यांपैकी तीन राज्यांमध्ये तरी स्वबळावर लढण्याचा काँग्रेसचा इरादा केव्हाचाच स्पष्ट झाला आहे. एकूणात तूर्तास तरी विरोधकांच्या आघाडीतील तडेच अधिक ठळकपणाने नजरेस येत आहेत.**

# रायगडातील ग्रामपंचायत निवडणुकांची रंगत





**खबरबात**
**प्रकाश सोनवडेकर**

रायगड जिल्ह्यात थंडीची चाहूल लागत असतानाच जिल्ह्यातील राजकीय वातावरण मात्र तापायला सुरुवात झाली आहे. जिल्ह्यातील २१० ग्रामपंचायतींच्या निवडणुकांसाठी ५ नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. या ग्रामपंचायत निवडणुकांची रणधुमाळी सुरू झाली आहे.

ग्रामपंचायत निवडणूक पक्षाच्या चिन्हावर लढवली जात नाही. तरीदेखील रायजकीय पक्ष यात सक्रिय असतात. स्थानिक पातळीवर युती-आघाडी केली जाते. ग्रामपंचायत निवडणुका काही दिवसांवर आल्यामुळे राजकीय पक्षांच्या बैठकांना जोर चढला आहे, मात्र गणिते न जुळल्याने अनेक ठिकाणी स्थानिक पातळीवर विविध युत्या-आघाड्या झाल्या आहेत. जिल्ह्यातील प्रमुख नेते एकाच बॅनरवर पहायला मिळत आहेत. युती-आघाडीचा प्रयोग न जमून आल्याने अनेक ठिकाणी पॅनल, गाव आघाडीच्या नावाखाली स्थानिक पातळीवर निवडणूक लढवली जात आहे. स्थानिक नेते, कार्यकर्ते हे ग्रामपंचायत निवडणुकीच्या प्रचारात अनेक ठिकाणी एकमेकांविरुद्ध उभे ठाकल्याने निवडणुकीत चुरस निर्माण झाली आहे.

जिल्ह्यातील २१० ग्रामपंचायतींच्या निवडणुका होत आहेत. या निवडणुका पक्षांच्या चिन्हावर लढवल्या जात नसल्या तरी सर्वच राजकीय पक्ष पूर्ण ताकदीने या लढाईत उतरले आहेत. सर्वच राजकीय पक्षांचे छोटे छोटे युनिट प्रत्येक गावात पहायला मिळतात. त्यामुळे बऱ्याच ठिकाणी एकाच राजकीय पक्षाला स्वबळावर निवडणूक लढवताना अनेक राजकीय अडचणींचा सामना करावा लागतो आहे. त्यामुळे या वेळी स्वबळावर निवडणुका लढवण्याऐवजी युती-आघाड्यांची समीकरणे जुळवावी लागतात. ही गणिते जुळवताना कसरत होते.

गेल्या वर्षी रायगड जिल्ह्यात झालेल्या ग्रामपंचायत निवडणुकांच्या वेळी शिवसेना ठाकरे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस अशी आघाडी होती, तर शिवसेना शिंदे गटाने भाजपला सोबत घेऊन निवडणुका लढवल्या होत्या. शेकापने बऱ्याच ठिकाणी स्वबळावर निवडणूक लढवली होती. आता अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस फुटून राज्यातील सत्तेत सहभागी झाल्यानंतर शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेसने एकत्र निवडणुका लढवण्याचा निर्णय जाहीर केला. शेतकरी कामगार पक्षाने काँग्रेस आणि शिवसेना ठाकरे गटाला सोबत घेऊन निवडणूका लढवण्याचा प्रयत्न केला. त्याला पूर्ण यश मिळाले नाही. किहीममध्ये काँग्रेस-शेकाप शिवसेना एकत्र आले, तर रेवदंड्यात या तीन पक्षांचे सुरू जुळले नाही. पारंपरिक राजकीय वैमनस्य, कुरघोडीचे राजकारण, जागावाटपात अनेक ठिकाणी सरपंचपदासाठी झालेली रस्सीखेच यामुळे आघाडीची गणिते फिसकटली आहेत.

अलिबाग-मुरूड विधानसभा मतदारसंघात शिवसेना शिंदे गट आणि शेकाप हे एकमेकांचे प्रमुख राजकीय शत्रू आहेत, परंतु मुरूडमधील आगरदांडा ग्रामपंचायत निवडणुकीत हे दोन्ही पक्ष एकत्र आले आहेत. शिंदे गटाचे विद्यमान आमदार महेंद्र दळवी आणि शेकापचे सरचिटणीस आमदार जयंत पाटील यांचे फोटो एकाच प्रचार पत्रकावर झळकले आहेत. दुसरीकडे अलिबागमध्ये वाडगाव ग्रामपंचायत निवडणुकीत आणखी वेगळी युती पहायला मिळते. तेथे राष्ट्रवादी काँग्रेसमधील जयेंद्र भगत आणि ऋषिकांत भगत हे दोन सख्खे भाऊ एकमेकांविरोधात मैदानात उतरले आहेत. जयेंद्र भगत यांना शिंदे गटाने, तर ऋषिकांत भगत यांना शेकापने साथ केली आहे. त्यामुळे येथे शेकापचे जयंत पाटील आणि राष्ट्रवादीचे सुनील तटकरे यांची छबी एकाच पत्रकावर झळकते आहे.

अजित पवार यांचा गट महाविकास आघाडीतून बाहेर पडल्याने दक्षिण रायगडात शिवसेना ठाकरे गटाची सर्वांत मोठी कोंडी झाली आहे. शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस हे एकमेकांचे पारंपरिक शत्रू, पण अडीच वर्षांच्या एकत्रित सत्ता काळात स्थानिक पातळीवर दोन्ही पक्षांचे सूर बऱ्यापैकी जुळले होते, मात्र आता दोघांमध्ये ताटातूट झाल्याने समीकरण बदलले आहे. दक्षिण रायगडमध्ये भरत गोगावले शिंदे गटात आहेत. त्यामुळे ठाकरे गटाची ताकद कमी झाली आहे. आता राष्ट्रवादी काँग्रेसदेखील फुटली आहे. दक्षिण रायगडात अजित पवार गटाची ताकद आहे. त्यांचा पाठिंबा या वेळी शिवसेनेला मिळणार नाही. त्यामुळे ठाकरे गटाला एकाकी झुंज देण्याची वेळ आली आहे. ही त्यांच्यासाठी कसोटी आहे.

या वेळी दक्षिण रायगडमध्ये भाजपदेखील पूर्ण ताकदीने या निवडणुकीत उतरला आहे. त्यामुळे ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये चुरस निर्माण झाली आहे.

जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणूक व सत्तास्थापनेसाठी एकजूट दाखविणारे जिल्ह्यातील स्थानिक नेते ग्रामपंचायत निवडणुकीत मात्र एकत्र येऊ शकलेले नाहीत. ५ नोव्हेंबर रोजी होणारी ग्रामपंचायत निवडणूक म्हणजे आगामी जिल्हा परिषद व पंचयात समित्यांच्या निवडणुकीची रंगीत तालीम ठरणार आहे. सर्वच राजकीय पक्षांनी आपली ताकद लावली आहे. त्यामुळे निवडणुका चुरशीच्या होणार आहेत. काही ग्रामपंचायतींमध्ये अनपेक्षित निकालाची शक्यता आहे.



## बदलते तंत्रज्ञान

# फेसबुक, इन्स्टाग्रामसाठी आता मोजावे लागणार पैसे



सोशल मीडिया यूजर्सच्या अडचणी सातत्याने वाढत आहेत, कारण बहुतांश सोशल मीडिया कंपन्या एकामागून एक सबस्क्रिप्शन मॉडेल्स लाँच करत आहेत. त्यामुळेच सोशल मीडिया वापरण्यासाठी तुम्हाला पैसे द्यावे लागतील. आता या यादीत मेटा मालकीच्या फेसबुक आणि इन्स्टाग्रामची नावे जोडली गेली आहेत. फेसबुक आणि इंस्टाग्रामसाठी सबस्क्रिप्शन शुल्क मेटाने जाहीर केले आहे.

आतापर्यंत मेटा आपल्या वापरकर्त्यांचा डेटा वापरत होता, परंतु युरोपियन नियमांच्या नवीन डेटा गोपनीयता कायद्यानंतर मेटाने डेटा ॲक्सेस न करण्यासाठी शुल्क आकारण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये युजर्सना कोणतीही जाहिरात मेटाकडून देण्यात येणार नाही. मेटा सबस्क्रिप्शन शुल्क १८ वर्षे आणि त्यावरील वयोगटासाठी आहे.

युरोपियन युनियन आणि स्वित्झर्लंडसारख्या देशांसाठी मेटा चार्ज लागू करण्यात आला आहे. सध्या हे शुल्क युरोपीय देशांसाठी आहे, मात्र येत्या काही दिवसांत ते भारतासह इतर देशांमध्येही लागू होण्याची शक्यता आहे. मेटा मालकीचे सदस्यत्व शुल्क १ नोव्हेंबरपासून लागू करण्यात आले आहे. मेटाच्या वेब सेवेसाठी दरमहा ९.९९ युरो (सुमारे ८८० रुपये) द्यावे लागतील तसेच आयओएस आणि ॲण्ड्राईड वापरकर्त्यांना १२.९९ युरो (सुमारे १,१०० रुपये) द्यावे लागतील, जे द प्लॅटफॉर्मच्या सदस्यता खर्चापेक्षाही खूप जास्त आहे.

काही काळापूर्वी तीनही ॲप्स एकत्र करून एक कंपनी स्थापन करण्यात आली होती, ज्याचे नाव मेटा होते. आता मेटा कंपनी स्वतः व्हॉट्सॲप, इन्स्टाग्राम आणि फेसबुकची अंमलबजावणी आणि नियंत्रण करते. याचा अर्थ मेटा काही पैसे घेऊन वापरकर्त्यांना प्रगत सुविधा देणार आहे. यासाठी कंपनी एक नवीन उत्पादन संस्था स्थापन करीत आहे, जी फेसबुक, इन्स्टाग्राम आणि व्हॉट्सॲपवर सशुल्क फीचर्ससाठी काम करणार आहे. या युनिटच्या प्रमुख प्रतिति रॉय चौधरी असतील, त्या यापूर्वी मेटाच्या हेड ऑफ रिसर्च प्रमुख होत्या.

# भारतीय सिने कलावंत पृथ्वीराज कपूर

## निमित्त



भारतीय चित्रपटसृष्टीत पृथ्वीराज कपूर हे ज्येष्ठ कलावंत म्हणून ओळखले जातात. त्यांचा जन्म ३ नोव्हेंबर १९०६ रोजी झाला. त्यांचे तीनही मुलगे राज कपूर, शम्मी कपूर आणि नंतर शशी कपूर यांनी चित्रपट क्षेत्रात पाऊल ठेवले.

पृथ्वीराज कपूर हे हिंदी सिनेमा आणि भारतीय रंगमंच यांचे प्रमुख आधारस्तंभ मानले जातात. पृथ्वीराज यांनी मूकपटात आपल्या अभिनयाच्या कारकिर्दीची सुरुवात केली. भारतीय जन नाट्य संघाच्या संस्थापक सदस्यांपैकी ते एक राहिले आहेत. पृथ्वीराजांनी १९४४मध्ये मुंबईत पृथ्वी थिएटरची स्थापना केली. या नाटक कंपनीची नाटके संपूर्ण देशभरात होत होती. भारतीय सिनेमाक्षेत्रात पुढे नामांकित झालेल्या कपूर खानदानाची ही सुरुवात होती.

पृथ्वीराज यांनी त्यांच्या पेशावर पाकिस्तानमधील एडवर्ड कॉलेजमधून उच्च शिक्षण घेतले. त्यांनी एक वर्षासाठी कायद्याचे शिक्षण घेतले, ज्यानंतर ते थिएटर विश्वात गेले. १९२८मध्ये मुंबई येथे त्यांचे आगमन काही मूकपटांमध्ये काम केल्यानंतर झाले. त्यांनी भारतातील पहिला श्राव्य चित्रपट ’आलम आरा’मध्ये एक प्रमुख भूमिका बजावली.

पृथ्वीराज कपूर जेव्हा १७ वर्षांचे होते तेव्हा त्यांच्या आई-वडिलांनी त्यांचा विवाह १४ वर्षांच्या रामशरणी मेहरा यांच्याशी केला. या जोडप्याला छोट्या वयातच १९२७ साली राज कपूर झाले. त्यानंतर पृथ्वीराज मुंबईला स्थायिक झाले त्या वेळी ते तीन मुलांचे बाप होते. पुढील वर्षी एका आठवड्याच्या अंतरातच पृथ्वीराज कपूर यांच्या दोन मुलांचा मृत्यू झाला. त्यांच्यातील एक मुलगा देवेंद्र (दवेरी) यांचा न्युमोनियाने मृत्यू झाला, तर दुसरा मुलगा रवींद्र (बिंदी) एका विचित्र घटनेमुळे विषबाधा झाल्यामुळे मरण पावला. रामशरणीचा भाऊ जुगल किशोर मेहरा याने नंतर चित्रपटांमध्ये प्रवेश केला.

अभिनय क्षेत्र पृथ्वीराज कपूरने लयलपुर आणि पेशावरमधील थिएटर्समध्ये अभिनय कारकिर्दीची सुरुवात केली. १९२८ साली मावशीकडून कर्ज घेऊन ते मुंबईत स्थायिक झाले. तेथे ते इम्पिरियल फिल्म कंपनीत दाखल झाले. तेथे त्यांनी दो धारी तलवार, सिनेमा गर्ल, शेर-ए-अरब आणि प्रिन्स विजयकुमार या चित्रपटांत अभिनय केला. १९२९मध्ये त्यांनी आपल्या तिसऱ्या सिनेमात प्रमुख भूमिका निभावली असली तरीही पृथ्वीराज कपूर यांनी भारताच्या पहिल्या आलम आरा (१९३१) या बोलपटात एक साहाय्यक भूमिका निभावली होती. विद्यापती (१९३७)मधील त्यांची कामगिरी अतिशय कौतुकास्पद होती. सोहब मोदी यांच्या सिकंदर (१९४१)मधील अलेक्झांडर द ग्रेट म्हणून त्याचे काम कदाचित सर्वांत चांगले आहे. इंग्रजी ग्रेट अँडरसन थिएटर कंपनीतही ते दाखल झाले व त्यासाठी ते मुंबईत एक वर्ष राहिले. या सर्व वर्षांत कपूर नाट्यसृष्टीशी सतत संबंधित राहिले आणि नियमितपणे रंगमंचावर भूमिका करीत होते. त्यांनी रंगमंच आणि सिनेमाचा पडदा या दोन्ही ठिकाणी एक बलदंड आणि अष्टपैलू अभिनेता म्हणून प्रतिष्ठा मिळवली.

चित्रदालन पुरस्कार आणि चित्रपट पृथ्वीराज कपूर यांना १९६९ साली कला क्षेत्रात पद्मभूषण देऊन भारत सरकारने सन्मानित केले होते. १९७२मध्ये त्यांचा मृत्यू झाल्यानंतर त्यांना दादासाहेब फाळके पुरस्कारही मिळाला. १९५४मध्ये संगीत नाटक अकादमी फेलोशिप देण्यात आली. १९६९मध्ये त्यांना भारत सरकारने पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित केले. आठ वर्षांच्या कालावधीसाठी ते राज्यसभेचे सदस्य राहिले. २९ मे १९७२ रोजी त्यांचा मृत्यू झाला. १९७१मध्ये त्यांना दादासाहेब फाळके पुरस्कारासाठी मरणोत्तर पुरस्कार देऊन गौरविण्यात आले होते. ते त्या पुरस्काराचे तिसरे मानकरी होते, भारतीय सिनेमामध्ये त्यांची सर्वाधिक प्रशंसा होत असे.
(साभार : विकीपीडिया)

**क्लिक...क्लिक...!**



तिरुवनंतपुरम : पर्यटनासाठी प्रसिद्ध असलेल्या केरळमध्ये पारंपरिक कला आजही जपल्या जातात. (छाया : सुधीर नाझरे)

## आरोग्य प्रहर

# बदलत्या हवामानामुळे वाढतंय इन्फेक्शन, करा घरगुती उपाय

बदलत्या हवामानामुळे आरोग्याच्या समस्या ही वाढू लागतात. हिवाळा सुरू होत असताना अनेकांना खोकला, घसा



खवखवणे, श्वास घेण्यास त्रास, ताप अशा समस्या भेडसावत आहेत. दिल्ली असो की मुंबई सगळीकडे प्रदूषणामुळे या समस्या वाढत आहेत. हिवाळ्यात प्रदुषणामुळे लोकांना श्वास घेताना अडचणी येतात. नाक आणि घशाच्या समस्या जाणवतात. अशा परिस्थितीत स्वतः ची काळजी कशी घ्यावी याबद्दल आपण जाणून घेणार आहोत.

**मिठाच्या पाण्याने गुळण्या करणे**

तज्ज्ञ सांगतात की, हवामान आणि प्रदूषणामुळे होणाऱ्या या समस्या टाळण्यासाठी सर्वप्रथम आपले नाक आणि घसा व्यवस्थित स्वच्छ करणे अत्यंत आवश्यक असते. घशाच्या संसर्गामुळे अनेक वेळा घसा सुजतो आणि वेदना होतात. अशा परिस्थितीत कोमट पाण्यात हलके मीठ टाकून दिवसातून दोन ते तीन वेळा गार्गल करावे. त्यामुळे सूज येण्यापासून आराम मिळेल आणि बॅक्टेरियाही मरतील.

वाफ घेतल्याने तुमचे तोंड, नाक, घसा आणि फुफ्फुसे स्वच्छ होतात. वाफ घेताना पाण्यात निलगिरीचे तेल किंवा काव्हॉल प्लस कॅप्सूल टाकावे. टॉवेलने डोके झाकून घ्या, नंतर वाफ घ्या. यामुळे अनुनासिक मार्गातील अडथळे दूर होतात, फुफ्फुसात जमा झालेला कफ आणि घाण सहज बाहेर पडते आणि सर्व समस्यांपासून आराम मिळतो. रात्री झोपण्यापूर्वी वाफ घेणे खूप फायदेशीर आहे.

**हळदीचे दूध**

रोज रात्री झोपण्यापूर्वी हळदीचे दूध प्या. पण या दुधातली मलई काढून टाका. दूध कोमट असावे. तुम्हाला हवे असल्यास तुम्ही या दुधात दोन चिमूटभर सुंठही टाकू शकता. हळदीमध्ये अँटीबॅक्टेरियल गुणधर्म आढळतात. सर्दी, खोकल्यासारख्या समस्यांमध्ये हे खूप फायदेशीर मानले जाते.

**तुळस**

तुळशीच्या पानांमध्ये अँटी-बॅक्टेरियल गुणधर्म असतात. हा डेकोक्शन बनवताना तुम्ही तुळस सोबत थोडी हळद, ज्येष्ठमध, गिलॉय देठ, चिमूटभर खडे मीठ आणि काळी मिरी इ.ही टाकू शकता. यामुळे खूप फायदा होईल.

थंड पदार्थ, तेलकट पदार्थ आणि बाहेर विकल्या जाणाऱ्या सर्व गोष्टी खाणे टाळा. लिंबू चहा प्या किंवा इतर मार्गाने तुमच्या आहारात व्हिटॅमिन सीचे प्रमाण वाढवा. आपल्या आहारात शक्य तितक्या द्रव पदार्थांचा समावेश करा. अशा स्थितीत रात्री जाड कपडे घाला.

# पाली-खोपोली राज्य महामार्गावर मोकाट गुरांचा ठिय्या

## वाहनचालकांची होतेय कसरत; अपघाताला निमंत्रण

**पाली : प्रतिनिधी**

वाकण-पाली-खोपोली या राज्य महामार्गाचे रुंदीकरण नुकतेच झाले आहे. त्यामुळे प्रवासी व वाहनचालक सुखावले आहेत, मात्र आता या मार्गावर मोकाट गुरांचा सातत्याने उपद्रव वाढला आहे. त्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत असून अपघाताला निमंत्रण मिळत आहे.

वाकण-पाली-खोपोली हा राज्यमहामार्ग प्रवासी व माल वाहतुकीसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. या मार्गावर वाहनांची वर्दळ सतत सुरू असते, मात्र मोकाट गुरांचा सातत्याचा होणारा रास्ता रोको वाहनचालक व प्रवाशांना त्रासदायक ठरत आहे. या गुरांबाबत अनेक वेळा त्यांचे मालक अनभिज्ञ असतात.

रात्रीच्या वेळी दुचाकीस्वार व वाहनचालकांना रस्त्यात बसलेली गुरे दिसत नसल्याने गुरांना धडकून अनेकदा अपघात झाल्याच्याही घटना घडल्या आहेत.

या मार्गावर गुरांच्या झुंज लागत असल्याने प्रवाशांना याचा अधिक धोका जाणवू लागला आहे. याबाबत संबंधित प्रशासनाने तातडीने गुरांच्या मालकांवर कारवाई करून या गुरांची रवानगी करण्याची मागणी होत आहे.



**या मार्गावर ठिकठिकाणी मोकाट गुरे ठाण मांडून बसलेली असतात. यामुळे येथून मार्ग काढणे अवघड होते. शिवाय रात्रीच्या वेळी अंधारात गुरे न दिसल्याने अपघात होतात. अपघातात अनेक गुरे जखमी होतात किंवा दगावतातदेखील त्यामुळे पशुपालक व शेतकऱ्यांनी आपली गुरे मोकाट सोडू नयेत.**

**-अभिजित देशमुख,** वाघोषी, सुधागड

---

### जाहीर नोटीस

**मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, मुंबई**
**(महाराष्ट्र मोटर वाहन नियम, १९८९ मधील २६०(१) अन्वये नोटीस)**
**एमएसीपी क्र : ८९८/२०२२**

**संतोष सुनिल देंधवाल व इतर ३** — **अर्जदार**
**विरूद्ध**
**शरद एस.गावडे** — **विरूद्ध पक्षकार**
**आणि**
**दि न्यु इंडिया ॲश्यु.कं.ली.** — **विमाकार**

**प्रति,**
**शरद एस.गावडे**
**पत्ता-** FL १०३, छेडा टेरेस,
हिस्सा नं. १, पीएल ११, कर्जत,
जि.रायगड-४१० २०१
यांस,

ज्याअर्थी सोबत जोडलेल्या अर्जानुसार आपणाविरूद्ध मोटर वाहन अधिनियम,१९८८ कलम १६५,पोट कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या स्वरूपाचा अपघाताबाबत मोटर वाहन अधिनियम १९८८, कलम १६६ आणि १४० अ नुसार भरपाई मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी, उक्त अर्जाची दिनांक **१०-०१-२०२४** रोजी **सकाळी ११.००** वाजता , माननीय **सदस्य श्री.संजय किशनराव चौदंते** यांच्या न्यायधिकरणात सुनावणी करून सदर अर्ज निकालात काढण्याचे ठरवले आहे, याची दखल घ्यावी.

या नोटीशीद्वारे आपणांस कळविण्यात येते की, वर नमुद केलेल्या दिनांकास आपण हजर रहावे व आपणांस जो कोणताही साक्षीपुरावा सादर करण्याची इच्छा असेल तो साक्षीपुरावा सादर करावा. अर्जामध्ये केलेल्या दाव्याबाबत आपण आपले लेखी निवेदन दाखल करू शकता. या नोटीशीद्वारे आपणांस असेही कळविण्यात येते की,संदर्भाधीन अर्ज निकालात काढण्यासाठी निश्चित केलेल्या दिनांकास आपण हजर राहिला नाहीत किंवा साक्षीपुरावा सादर करू शकला नाहीत, तर सदरहू अर्जाची सुनावणी व निर्णय आपल्या अनुपस्थितीत करण्यात येईल, याची दखल घ्यावी.

ही नोटीस आज दिनांक **१२-१०-२०२३** रोजी माझ्या सहीने व न्यायाधिकरणाच्या शिक्क्यानिशी देण्यात आली आहे.

कोर्टाचा शिक्का

आदेशावरून
सही/-
प्रबंधक
मोटार अपघात दावा न्यायाधिकरण,
९, हजारीमल सोमाणी मार्ग, छत्रपती शिवाजी टर्मिनससमोर,
मुंबई ४००००१

---

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्ट 'अ' मध्ये वर्णन केलेली मिळकत प्रस्तावित **१ ) श्री ज्ञानेश्वर किसन माळी २ ) श्री. सुरेश गोपाळ फडके ३ ) श्री. दिगंबर दत्तात्रेय चोरघे** राहणार मौजे उमरोली, ता. पनवेल, जि. रायगड यांच्या मालकी हक्काची, ताबेकब्जातील व वहिवाटीतील असून सदर मिळकत आमचे पक्षकार **१) श्री. विलास सुदाम पाटील २ ) श्री. जस्बीर सिंग सुरींदरसिंग भट्टी** हे खरेदी करणार असुन सदर मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे :

**शेतजमिनीचे वर्णन**
**मौजे उमरोली, ता. पनवेल, जि. रायगड**

| गाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| उमरोली | ४७ | २ | ०-२३-२० पो.ख. ०-००-५० | ०.६९ |
| | | | **एकूण क्षेत्र ०-२३-७०** | |

प्राप्त परिस्थितीत वरील परिशिष्ट 'अ' मध्ये नमूद केलेल्या मिळकतीमध्ये वा कोणत्याही भागावर कोणाही व्यक्तीचे कासल्याही प्रकारचे करार – मदार, गहान, दान, बक्षीस, फरोक्त, तारण, भाडेरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम. ओ. यु. वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींनी वा संबंधीतांनी हि नोटिस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे.

वरिल मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तकार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व जाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे- पक्षकार सदर मिळकत खरेदी करतील व त्यानंतर आलेल्या तकारी दावे हरकती या रद्दबातल आहेत व त्या जाणिवपूर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

**दिनांक : ०२/११/२०२३**
**ठिकाण : पनवेल**

**सही/-**
**ॲड. महेश ग. भगत**
**बी. ए. एल. एल. बी**
**पत्ता : शॉप नं. २२, प्लॉट नं. ५१ बी,**
**खांदा कॉलनी, तालुका पनवेल, जि. रायगड,**
**मो. नं. - ८६५२०३४७०३**

---

### जाहीर नोटीस

ॲड.बी.एच.त्रिवेदी

**मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, मुंबई**
**(महाराष्ट्र मोटर वाहन नियम, १९८९ मधील २६०(१) अन्वये नोटीस)**
**एमएसीपी क्र : १७५७/२०२२**

**राजराम रामदरस विश्वकर्मा** — **अर्जदार**
**विरूद्ध**
**अक्षय तुकाराम मालुसरे** — **विरूद्ध पक्षकार**
**आणि**
**रिलायंस जनरल जन.इंन्शु.कं.ली.** — **विमाकार**

**प्रति,**
**अक्षय तुकाराम मालुसरे**
**पत्ता-** रेव्याची वाडी, तालुका-रोहा,
जिल्हा-रायगड,महाराष्ट्र-४०२ ३०८.
यांस,

ज्याअर्थी सोबत जोडलेल्या अर्जानुसार आपणाविरूद्ध मोटर वाहन अधिनियम,१९८८ कलम १६५,पोट कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या स्वरूपाचा अपघाताबाबत मोटर वाहन अधिनियम १९८८, कलम १६६ आणि १४० अ नुसार भरपाई मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी, उक्त अर्जाची दिनांक **२४-११-२०२३** रोजी **सकाळी ११.००** वाजता , माननीय **सदस्य श्री.मनिष अरुण कोठारी** यांच्या न्यायधिकरणात सुनावणी करून सदर अर्ज निकालात काढण्याचे ठरवले आहे, याची दखल घ्यावी.

या नोटीशीद्वारे आपणांस कळविण्यात येते की, वर नमुद केलेल्या दिनांकास आपण हजर रहावे व आपणांस जो कोणताही साक्षीपुरावा सादर करण्याची इच्छा असेल तो साक्षीपुरावा सादर करावा. अर्जामध्ये केलेल्या दाव्याबाबत आपण आपले लेखी निवेदन दाखल करू शकता. या नोटीशीद्वारे आपणांस असेही कळविण्यात येते की,संदर्भाधीन अर्ज निकालात काढण्यासाठी निश्चित केलेल्या दिनांकास आपण हजर राहिला नाहीत किंवा साक्षीपुरावा सादर करू शकला नाहीत, तर सदरहू अर्जाची सुनावणी व निर्णय आपल्या अनुपस्थितीत करण्यात येईल, याची दखल घ्यावी.

ही नोटीस आज दिनांक **२७-०९-२०२३** रोजी माझ्या सहीने व न्यायाधिकरणाच्या शिक्क्यानिशी देण्यात आली आहे.

कोर्टाचा शिक्का

आदेशावरून
सही/-
प्रबंधक
मोटार अपघात दावा न्यायाधिकरण,
९, हजारीमल सोमाणी मार्ग, छत्रपती शिवाजी टर्मिनससमोर,
मुंबई ४००००१

---

### जाहीर नोटीस

**मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, मुंबई**
**(महाराष्ट्र मोटर वाहन नियम, १९८९ मधील २६०(१) अन्वये नोटीस)**
**एमएसीपी क्र : ५६०/२०२३**

**उस्मान यासिन शेख** — **अर्जदार**
**विरूद्ध**
**निरज दिलीप शाह** — **विरूद्ध पक्षकार**
**आणि**
**आयसीआयसीआय लोंबार्ड जनरल जन.इंन्शु.कं.ली.** — **विमाकार**

**प्रति,**
**निरज दिलीप शाह**
**पत्ता-** फ्लॅट नं. १२०२, साई मारेश्वर आंगणे,
प्लॉट नं. ४८, सेक्टर ०४, खारघर,
ता.पनवेल, जि.रायगड. ४१२ २१०
यांस,

ज्याअर्थी सोबत जोडलेल्या अर्जानुसार आपणाविरूद्ध मोटर वाहन अधिनियम,१९८८ कलम १६५,पोट कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या स्वरूपाचा अपघाताबाबत मोटर वाहन अधिनियम १९८८, कलम १६६ आणि १४० अ नुसार भरपाई मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी, उक्त अर्जाची दिनांक **२०-१२-२०२३** रोजी **सकाळी ११.००** वाजता , माननीय **सदस्य श्री.सचिन बि.मुंडे** यांच्या न्यायधिकरणात सुनावणी करून सदर अर्ज निकालात काढण्याचे ठरवले आहे, याची दखल घ्यावी.

या नोटीशीद्वारे आपणांस कळविण्यात येते की, वर नमुद केलेल्या दिनांकास आपण हजर रहावे व आपणांस जो कोणताही साक्षीपुरावा सादर करण्याची इच्छा असेल तो साक्षीपुरावा सादर करावा. अर्जामध्ये केलेल्या दाव्याबाबत आपण आपले लेखी निवेदन दाखल करू शकता. या नोटीशीद्वारे आपणांस असेही कळविण्यात येते की,संदर्भाधीन अर्ज निकालात काढण्यासाठी निश्चित केलेल्या दिनांकास आपण हजर राहिला नाहीत किंवा साक्षीपुरावा सादर करू शकला नाहीत, तर सदरहू अर्जाची सुनावणी व निर्णय आपल्या अनुपस्थितीत करण्यात येईल, याची दखल घ्यावी.

ही नोटीस आज दिनांक **२५-१०-२०२३** रोजी माझ्या सहीने व न्यायाधिकरणाच्या शिक्क्यानिशी देण्यात आली आहे.

कोर्टाचा शिक्का

आदेशावरून
सही/-
प्रबंधक
मोटार अपघात दावा न्यायाधिकरण,
९, हजारीमल सोमाणी मार्ग, छत्रपती शिवाजी टर्मिनससमोर,
मुंबई ४००००१

---

### महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

**मुदतवाढ सूचना क्र. ४**

#### ई निविदा सूचना क्र. ५९/२०२३-२०२४ (मुंबई) करीता

दिनांक १३/०९/२०२३ रोजी दैनिक नवाकाळ, मुंबई, दैनिक मिड डे, मुंबई, दैनिक प्रातःकाल, मुंबई, दैनिक खबरें आज तक, मुंबई, दैनिक रामप्रहर, रायगड या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वरील ई निविदा सूचनेतील खालील कामाकरीता ई निविदा महामंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्धेबाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव |
|---|---|
| १. | तळोजा औद्योगिक क्षेत्र.. तळोजा औद्योगिक क्षेत्रातील केमिकल, न्यू केमिकल झोन व एल, एम, व्ही आणि टी ब्लॉकमध्ये आरसीसी बिल्टअप गटर्ससह सिमेंट कॉंक्रीटचे रस्ते बांधणे. |

सदर कामाकरीता निविदा प्रपत्र दिनांक ०८/११/२०२३ पर्यंत महामंडळाच्या https://www.midcindia.org या संकेतस्थळावर उपलब्ध असेल.

ज्या निविदा धारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल, त्यांनी निविदेमध्ये बदल करुन किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धिपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा देकार सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.

सदर निविदा सूचनेत इतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

---

### सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, पनवेल तालुका यांचे समोर

**सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, पहिला मजला कृषी उत्पन्न बाजार समिती,**
**सहकार मार्ग, रायगड बाजाराच्या बाजूला पनवेल जि.रायगड ४१०२०६**

महाराष्ट्र सहकारी अधिनियम १९६० चे कलम १०१ खाली दाखल दावा नोटीस

कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल ता. पनवेल जि. रायगड या संस्थेने या कार्यालयाकडे महाराष्ट्र सहकारी कायदा अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये खालील व्यक्ती विरूध्द थकीत कर्जाचा भरणा केला नसल्याचे नमुद करून वसुली प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज केलेला आहे.

त्यानुसार या कार्यालयात वेळोवेळी सुनावणी ठेवण्यात आली, तथापी खालील नमुद व्यक्तींना सुनावणी नोटीसची पोहोच होत नसल्याने नैसर्गिक न्याय तत्वानुसार म्हणने दाखल करण्यासाठी जाहीर नोटीस देण्यात येत आहे या जाहीर नोटीस द्वारे आपणास पुन्हा एक संधी देण्यात येत असून सदर दाव्याबाबत अंतिम सुनावणी २०/११/२०२३ रोजी सकाळी ११.३० वाजता ठेवण्यात आली असून सदर सुनावणीस आपण स्वतः वा आपले प्रतिनिधी मार्फत उपस्थीत राहावे आपण गैरहजर राहिल्यास आपल्या अनुपस्थीतीत दाव्याचा निकाल केला जाईल व नंतर आपले कोणतेही म्हणने ऐकून घेतले जाणार नाही.

**वैयक्तिक कर्ज**

| अ.क्र. | दावा क्रमांक | कर्जदार / जामिनदार | पत्ता | थकीत कर्ज | जाहिर नोटीस |
|---|---|---|---|---|---|
| १ | ३४ / २०२३ | श्रीमती प्रिया राजेश सावंत (कर्जदार) | रा. पळस्पे, घर नं. ११, मुंबई गोवा हायवे रोड, गवंडी आळी, ग्रामपंचायत ऑफिस जवळ, पो. पळस्पे, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२२१ | ३९,४४८/- | प्रतिवादी क्र. १ करिता |
| | | श्रीमती नम्रता नरेंद्र करण (जामिनदार) | रा. पळस्पे, तिसाई मंदिराजवळ, ता-पनवेल, जि- रायगड. ४१०२२१ | | |
| | | श्रीमती वैशाली चंद्रकांत ठाकूर (जामिनदार) | रा. पळस्पे, तिसाई मंदिराजवळ, ता. पनवेल, जि. रायगड. ४१० २२१ | | |
| २ | ३१ / २०२३ | श्रीमती अनिता मोहन खुटले (कर्जदार) | रा. नांदगांव, घर नं. १४१, मुंबई पुणे हायवे रोड, मरी आई मंदिराजवळ, पो. पळस्पे, ता. पनवेल, जि. रायगड. ४१० २२१ | ४७,२९१/- | प्रतिवादी क्र. २ व ३ करिता |
| | | श्रीमती भारती भालचंद्र खुटले (जामिनदार) | रा. नांदगांव, ४५०, मारूती मंदिर जवळ, पो. पळस्पे, ता-पनवेल, जि-रायगड. ४१०२२१ | | |
| | | श्री. वैभव प्रकाश खुटले (जामिनदार) | रा. नांदगांव, पो. पळस्पे, वरची आळी, हनुमान मंदिराजवळ, ता. पनवेल, जि. रायगड. ४१० २२१ | | |

सदरची नोटीस माझे सही शिक्यानिशी दिली आहे,
स्थळ :- पनवेल
दिनांक :- ०१ / ११ /२०२३
जावक क्रमांक, २३६३/२०२३ - २४

शिक्का

**सही/-**
**(भारती काटुळे)**
**सहाय्यक निबंधक**
**सहकारी संस्था, पनवेल, जि.रायगड**

---

सिडको
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना

**(हक्कसोड पत्राबाबत)**

जाहीर सूचनेद्वारे तमाम जनतेस कळविण्यांत येते की, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाकरीता संपादित होणाऱ्या जमिनीच्या साडेबावीस टक्के योजने अंतर्गत वाटप करण्यांत आलेल्या **मौजे-वाघिवली** निवाडा युनिट क्रमांक **WAG-ICIG-९४+९६** मधील बांधकाम क्र. WG-१२७, १२९, १३०, १३०A, १३०B क्षेत्र ६२०.०० चौ.मी. या संपादित जमिनीचे खातेदार **श्री./श्रीमती चाहूबाई बामा पाटील, राजेंद्र बामा पाटील, सागर बामा पाटील, सुनील राघो पाटील, रंजना शाम मुंडकर, ताईबाई दिलखुश गोवारी, समसू राघो पाटील, सुभाष राघो पाटील** यांचेकडून संपादित झालेली आहे. या मिळकतीपोटी त्यांना पुष्पक नोड येथील **भूखंड क्र. १५४ ,सेक्टर-२६, क्षेत्र-६२०.००,** चौ.मी. चे संचिका क्र. **WAG-ICIG-९४+९६ मौजे-वाघिवली** वाटपपत्र देण्यात आलेले आहे. वरील भूधारकांपैकी **कै. जोमिबाई राघो पाटील (मयत) हे मयत झाल्याने त्याच्या वारसांची नोंद घेऊन शुध्दीपत्र देण्यात आले आहे.**

आता खातेदार **समसू राघो पाटील व इतर** यांनी त्यांचा वाटपित झालेला पुष्पक नोड येथील **भूखंड क्र. १५४ ,सेक्टर-२६, क्षेत्र-६२०.०० चौ.मी.** या भूखंडाबाबत हक्कसोड सादर केले आहे.

दुय्यम निबंधक **पनवेल-५ नोंदणी क्रमांक-पवल-५-३६५७-२०२३ पावती क्र.४०६४, दिनांक** ०३.०३.२०२३ यांच्याकडील नोंदणीकृत केलेले हक्कसोडपत्र सादर केले असून सदरील हक्कसोडपत्रात नमूद केल्यानुसार त्यांना वाटपित झालेल्या भूखंडाबाबत खालील खातेदारांच्या लाभात हक्क सोडले आहेत. :-

उक्त दुय्यम निबंधक पनवेल येथील नोंदणीकृत विनामोबदला हक्कसोडपत्रामध्ये नमूद केल्यानुसार खालील त्यांना वाटप झालेल्या भूखंडाचे हक्क या खातेदारांच्या लाभात सोडले आहेत ते खातेदार पुढील प्रमाणे:-

| अनु. क्र. | वारस दाखल्यानुसार हक्कसोडपत्र लिहून देणार (i) | निवाड्यातील जाहीर खातेदार हक्कसोडपत्र लिहून घेणार (ii) |
|---|---|---|
| १. | **रंजना शाम मुंडकर** | **समसू राघो पाटील** |
| २. | **ताईबाई दिलखुश गोवारी** | **सुभाष राघो पाटील** |
| ३. | | **सुनील राघो पाटील** |

उपरोक्त हक्कसोडपत्रा नुसार केवळ टेबल क्र. (ii) मध्ये नमुद केलेली व्यक्तीच सदरील भूखंडाचे भाडेपट्टा करारनामा करण्यास व भूखंडाचा ताबा घेण्यास पात्र ठरु शकते. हक्कसोडपत्र विचारात घेऊन ज्यांनी वाटपित भूखंडामधील हक्क व हितसंबंध सोडून दिलेले आहेत. त्यांची नावे वगळून ज्यांना जे हक्क प्रदान करण्यात आलेले आहेत, अशा व्यक्तीच्या नावे सिडकोकडून भूखंडाचे भाडेपट्टा करारनामा करुन भूखंडाचा ताबा आजच्या तारखेपासून ३० दिवसांनंतर कोणत्याही दिवशी देण्याचे प्रस्तावित आहे.

तरी वरील वाटपित केलेल्या भूखंडासंदर्भात वर नमूद केलेल्या म्हणजेच ज्यांचे लाभात हक्क व अधिकार प्रदान करण्यांत आलेले आहेत त्या भूधारकांना सदर योजनेनुसार या पुढे लाभ देणेची पुढील कायदेशीर प्रक्रिया करण्यासंदर्भात जर कोणाची हरकत / तक्रार असेल तर त्यांनी **अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (नमुंआंवि), तळ मजला, सिडको भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई** यांचे कार्यालयात या सूचनेच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत सर्व पुरावे व योग्य त्या कागदपत्रांसह दाखल करावेत. वर नमूद केल्याप्रमाणे वाजवी पुरावा असणारी कोणतीही हरकत / तक्रार सदर मुदतीत प्राप्त न झाल्यास सदर योजने अंतर्गत सिडकोद्वारे करण्यांत येणाऱ्या पुढील कायदेशीर कार्यवाहीबद्दल कोणाचीही हरकत नाही असे समजुन वरील वाटपित भूखंडाबाबत सिडकोतर्फे पुढील कार्यवाही करण्यांत येईल याची नोंद घ्यावी.

**अति.मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
**(नमुंआंवि)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

**सिडको/जनसंपर्क/४०२/२०२३-२४**

## निवडक

### एसटी बसमधून डिझेलची चोरी

**पनवेल** : तालुक्यातील केळवणे येथे उभी करून ठेवलेल्या एका एसटी बसमधून अज्ञात चोरट्याने ४०५ लिटर डिझेलची चोरी केल्याची घटना घडली आहे. केळवणे गाव येथील आर्यन फर्निचर समोर एसटी बस (एमएच १४ बीटी ३१९७) राजेंद्र भोसले यांनी उभी ठेवली असताना अज्ञात चोरट्यांनी बसमधून ४०५ लिटर डिझेलची चोरी केली. याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### मारहाण करून एकास लुटले

**पनवेल** : टेलिग्रामच्या माध्यमातून सहा महिन्यांपूर्वी ओळख झालेल्या एकाला त्याच्या घरात जबरीने प्रवेश करून दोघाजणांनी हाताबुक्क्याने व चाकूने वार करून त्याच्या खिशातील तीन हजार रुपये चोरून नेल्याची घटना इंडिया बुल्स ग्रीन सोसायटी येथे घडली आहे. कोन गाव येथील इंडिया बुल्स ग्रीन सोसायटीमध्ये राहणारे भरत अग्रवाल यांची सहा महिन्यांपूर्वी कविता भट हिच्याबरोबर टेलिग्रामच्या माध्यमातून ओळख झाली. भरत अग्रवाल यांनी महिलेला घरी बोलवले असता तिने नितीन सिंग याच्यासह त्याच्या घरात प्रवेश करून दोघा जणांनी त्याला हाताबुक्क्याने व चाकूने वार करून त्याच्या खिशातील तीन हजार रुपये चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### उद्यानांच्या दुरूस्तीची मागणी

**पनवेल** : शहरासह वसाहतींच्या वैभवात भर घालणाऱ्या उद्यानांची दयनीय अवस्था झाली आहे. अनेक उद्यानांमध्ये सुरक्षेचा अभाव असल्याने मद्यपी, गर्दुल्ल्यांचा वावर आहे. तुटलेल्या खेळण्यांमुळे या उद्यानांच्या दुरूस्तीची मागणी करण्यात येत आहे. पनवेल महापालिकेने सिडको वसाहतीतील सिडको मंडळाकडून ६८ उद्याने हस्तांतरित करून घेतली आहेत, तसेच यात क्षेत्रफळानुसार कंत्राटी कामगारदेखील नेमले आहेत. खारघर, कळंबोली, कामोठे, नवीन पनवेल या सिडको वसाहतींमधील उद्यानांची दूरवस्था झाली आहे. या उद्यानांचे सुशोभिकरण करावे, अशी मागणी स्थानिकांमधून व्यक्त केली जात आहे. याबाबत महापालिकेचे उद्यान अधीक्षक राजेश कर्डिले यांना विचारले असता, पनवेल महापालिकेने सिडकोकडून खारघर, नवीन पनवेल, कळंबोली आणि कामोठे येथील ६८ उद्याने हस्तांतरित केली आहेत. वसाहतीमधील काही उद्यानांची कामे सुरू आहेत. त्याचबरोबर तुटलेल्या खेळण्यांचीही दुरुस्ती केली जाईल, असे सांगितले.

# नवी मुंबईतील वाहतूक कोंडीवर उपायांचे प्रयत्न

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

दिवाळीच्या खरेदीसाठी नवी मुंबईतील ठरावीक बाजारपेठांच्या परिसरात होणारी मोठी कोंडी लक्षात घेऊन वाहतूक पोलिसांनी यासंबंधी नियोजन केले जाणार आहे. वाशी येथील एपीएमसी बाजारांच्या परिसरात आठवडाभरापासून खरेदीसाठी ग्राहकांची झुंबड उडू लागली असून या संपूर्ण परिसरात मोठी कोंडी होताना पहायला मिळत आहे. या ठिकाणी वाहतूक नियोजनासाठी पोलिसांची कुमक वाढविण्याची आखणी केली जाणार आहे.



**वाहतूक पोलिसांचे दिवाळीसाठी नियोजन**

नवी मुंबई शहर हे वेगवेगळ्या उपनगरांमध्ये विभागले गेले असले तरी सणासुदीच्या काळात येथील ठराविक उपनगरांमध्ये खरेदीसाठी ग्राहकांची मोठी झुंबड उडते असे चित्र नेहमीच पाहायला मिळते. वाशी येथील एपीएमसी परिसरातील मसाला तसेच धान्य बाजारात दिवाळी खरेदीसाठी संपूर्ण मुंबई महानगर पट्ट्यातून ग्राहक येत असतात.

त्यामुळे या ठिकाणी दरवर्षी अभूतपूर्व अशी कोंडी झालेली पाहायला मिळते. या वाहतूक कोंडीचा भार वाशी येथील अरेंजा कॉर्नर चौक तसेच सतरा प्लाझा येथील मुख्य मार्गावरही येतो. याशिवाय वाशी सेक्टर ९, सतरा प्लाझा परिसर, सीवूड्स येथील रेल्वेस्थानक मॉल परिसर, वाशी येथील रेल्वेस्थानक भागातील व्यापारी संकुले अशा ठिकाणीदेखील वाहनांची मोठी गर्दी होत असते. दिवाळीच्या कालावधीत वाशी, कोपरखैरणे यांसारख्या उपनगरांमध्ये एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्यासाठी या कोंडीमुळे मोठा कालावधी लागतो.

दरम्यान, नवी मुंबई वाहतूक पोलिसांनी यंदाच्या वर्षी या कोंडी होणाऱ्या ठिकाणांवर कोणते उपाय आखता येतील यासंबंधीचा सविस्तर अभ्यास सुरू केला आहे, अशी माहिती नवी मुंबई वाहतूक शाखेचे उपायुक्त तिरुपती काकडे यांनी लोकसत्ताला दिली. काही चौकांमध्ये पोलीस कर्मचारी वाढविणे तसेच वाशीसारख्या उपनगरांमध्ये वाहतूक सुरळीत होण्यासाठी कोणते उपाय आखता येतील याचाही अभ्यास केला जात आहे.

### सणासुदीला कोंडी होणारी ठिकाणे

**वाशी सेक्टर ९/१०, १५, १६. कोपरखैरणे रा. फ. नाईक चौक, सेक्टर १५ येथील नाका, घणसोली गावठाण, ऐरोली सेक्टर ५, नेरूळ स्टेशन परिसर, पाम बीचलगत पेट्रोल पंप परिसर, शिरवणे गाव, सीबीडी सेक्टर ४चा परिसर, एपीएमसी बाजारपेठा, वाशी रेल्वे स्थानक परिसर, सीवूड्स मॉल परिसर.**

## जमिनीचे हक्क मिळण्यासाठी कुकशेत ग्रामस्थ लढणार कायदेशीर लढाई

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई एमआयडीसी सिडको प्रकल्पग्रस्त जमीन हक्क समितीचे मुख्य समन्वयक डॉ. विनोद पाटील, सुनील पाटील, डॉ. विजय पाटील व रूपेश ठाकूर यांच्या पुढाकारातून नवी मुंबईतील जमीन पुनर्वसनाबाबत गावोगावी चर्चासत्र आयोजित करून ग्रामस्थांना जागरूक करण्यात येत आहे. त्या पार्श्वभूमीवर समाजसेविका शालिनी म्हात्रे यांच्या पुढाकाराने कुकशेत ग्रामस्थांसाठी मार्गदर्शन आणि चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. या चर्चासत्रात ग्रामस्थांनी एकत्रितपणे न्यायालयीन लढाई लढण्याचा निर्धार केला.



नवी मुंबई एमआयडीसीमधील प्रकल्पग्रस्त खातेदार तसेच गावठाणा पुनर्वसनासंदर्भात एमआयडीसीने कुकशेतमधील ग्रामस्थांचे पुनर्वसन करताना तसेच त्यांची शेतीची जमीन संपादित केल्यानंतर फसवणूक केलेली आहे. ही संपादित केलेली जमीन हक्क मालकास परत मिळण्यासाठी कायदेशीर लढाई लढायची असल्याचे शालिनी म्हात्रे यांनी सांगितले. कुकशेत गावाचे गावठाण फसवणुकीने संपादित केलेले असून एमआयडीसीने औद्योगिक कारणाकरिता संपादित केलेल्या जमिनीचा वापर रहिवासी वापरामध्ये करण्यात येत आहे. त्यामुळे ही जमीन परत मिळावी याकरिता कायदेशीर लढा देण्याबाबत नवी मुंबई एमआयडीसी सिडको प्रकल्पग्रस्त जमीन हक्क समितीचे सल्लागार ॲड. विकास पाटील व गावठाण विकास सामाजिक संस्थेचे अध्यक्ष किरण भिकाजी पाटील यांनी मार्गदर्शन केले.

चर्चासत्रचे संचालन संतोष रमेश सुतार यांनी केले. कार्यक्रमास अंकुश म्हात्रे, भाजपचे माजी नगरसेवक सुरज पाटील यांसह शेकडो ग्रामस्थ उपस्थित होते.

## पनवेलमध्ये दीपोत्सवानिमित्त संगीत मैफल

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल कल्चरल असोसिएशन आणि ज्येष्ठ नागरिक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने दीपावलीच्या पूर्वसंध्येला दीपोत्सवी मैफलीचे आयोजन केले जात असून यात पं जीतेंद्र अभिषेकी आणि पं. राजन मिश्रा यांचे शिष्य पं. मोहन दरेकर आणि दीपिका भिडे-भागवत शास्त्रीय, उपशास्त्रीय गायन सादर करतील. त्यांना हार्मोनियमवर अनंत जोशी तर तबल्यावर किशोर पांडे साथसंगत करतील. हा कार्यक्रम शनिवारी (दि. ११) सायं. ५.३० वा. ज्येष्ठ नागरिक संघ सभागृह, पनवेल येथे होणार असून दोन्ही संस्थांच्या सदस्य आणि कुटुंबियांसाठी विनाशुल्क आहे.

## घरफोडी करणारे दोन आरोपी गजाआड

**पनवेल : वार्ताहर**

तालुक्यातील ओवळेगावात एका किराणा मालाचे दुकानाचे शटर उचकटून सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम असा एक लाख सात हजार रुपये किमतीचा मुद्देमाल दोन अज्ञात चोरांनी चोरून नेला होता. या प्रकरणी दोन आरोपींना पनवेल शहर पोलिसांनी गजाआड केले आहे.

सुनील दिनकर चव्हाण (वय १९) आणि वंश कालिदास भोरे (वय २१) असे अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. तालुक्यातील ओवळे गावात या आरोपींनी अंधाराचा फायदा फिर्यादीच्या किराणा मालाच्या दुकानाचे लोखंडी शटर उचकटून आतमध्ये प्रवेश करून ४५ हजार रुपये किमतीची सोन्याची अंगठी, ३० हजार रुपये किमतीची बोरमाळ,



२००० हजार रुपये रोख आणि ३० हजार रुपये किमतीची दुचाकी चोरून नेली होती.

या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल होताच वपोनि. नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अभयसिंह शिंदे, हवालदार नितीन वाघमारे, पोहवा परेश म्हात्रे, पोना रविंद्र पारधी, पोना विनोद देशमुख, पोशि प्रसाद घरत, पोशि नितीन कांबळे आणि पोशि साईनाथ मोकल यांच्या पथकाने तांत्रिक तपास आणि गुप्त बातमीदाराच्या मदतीने आरोपींना ताब्यात घेतले आहे.

## लेखणी समाजाला दिशा देऊ शकते -कवी रामदास फुटाणे



**पनवेल : वार्ताहर**

लेखणीमध्ये समाजपरिवर्तनाची ताकद आहे. लेखणी समाजाला दिशा देऊ शकते, असे उद्गार सुप्रसिद्ध कवी, लेखक रामदास फुटाणे यांनी पनवेल येथे साप्ताहिक पनवेल टाइम्सच्या वर्धापन दिनानिमित्ताने आयोजित पुरस्कार सोहळ्यात काढले.

या सोहळ्यास सुप्रसिद्ध कवी अरुण म्हात्रे, चित्रपट-नाट्य निर्मात्या कल्पना विलास कोठारी, पनवेल औद्योगिक वसाहतीचे अध्यक्ष विजय लोखंडे, माजी नगराध्यक्ष सईद मुल्ला, 'पनवेल टाईम्स'चे संपादक गणेश कोळी उपस्थित होते.

या सोहळ्यात पनवेलच्या मोहो गावातील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, पनवेल ट्रेकर्स, ज्येष्ठ गझलकार ए. के. शेख, राजिप आदर्श शिक्षिका ज्योती भोपी, ज्येष्ठ पत्रकार घन:श्याम मानकामे, वृक्षप्रेमी चार्वी चौबळ व सांगवी चौबळ, उपजिल्हाधिकारी सायली ठाकूर, सीमेवरील सैन्यांना दिवाळी फराळ पाठवणारी भारत विकास परिषद, कराटे कोच मंदार पनवेलकर, दिशा महिला सामाजिक संस्था, सिटीजन वेल्फेअर असोसिएशन, चित्रपट=नाट्य निर्मात्या कल्पना कोठारी, रंगकर्मी शामनाथ पुंडे, शुद्ध पाण्यासाठी लढा देणारे लाडिवली महिला मंडळ, डॉ. प्रा. आमोद ठक्कर, रस्त्यावरील चहा विक्रेता रवींद्र मगर, नॅपकिन बुके निर्मात्या मानसी पोळ यांना पनवेल टाईम्स सन्मान पुरस्काराने गौरविण्यात आले.

## नवीन आवक न झाल्याने कांदा कडाडला

**उरण : वार्ताहर**

पाऊस लांबल्याने यंदा कांद्याची लागवड दोन महिने उशिरा झाली. त्यामुळे नवीन कांदा बाजारात यायला विलंब झाल्याने कांद्याच्या दरात सातत्याने वाढ होत आहे. किरकोळ बाजारात कांद्याने ७० रुपयांचा भाव गाठलातर सुपर फाईन कांदा ८० रुपये किलो दराने विकला जात आहे. आणखी काही दिवस कांद्याचे भाव उच्च पातळीवर राहतील, असा अंदाज व्यापारी व्यक्त करीत आहेत.



नवीन कांदा यायला दोन महिन्यांचा कालावधी आहे. तोपर्यंत हा कांदा बाजारात उपलब्ध होणार आहे. घाऊक बाजारातच ७० आणि ८० रुपये किलोला भाव द्यावा लागत असल्याने किरकोळ बाजारात हा कांदा ८० रुपयांवर गेला आहे, तर दोन नंबरचा कांदा ७० रुपये किलोने खरेदी करावा लागत आहे.

उरण चारफाटा, आनंद नगर, कामगार वसाहत रोड, गांधी चौक, बाजारपेठ आदि ठिकाणी हात गाड्या उभ्या आहेत. आवक निम्म्यावर आल्याने कांद्याची मागणी पूर्ण होऊ शकत नाहीत. परिणामी कांद्याचे दर वाढायला सुरुवात झाली आहे. त्यातही बाजारात कांद्याच्या मागणीत वाढ झाली आहे. घाऊक बाजारात काही महिन्यांपासून उत्तम दर्जाचा नंबर ८० दराने विकला जात आहे.

## नवी मुंबईतील आदिवासी भवनाचे उद्या लोकार्पण

**नवी मुंबई : बातमीदार**

सांस्कृतिक कार्यक्रम ही कायम अजरामर रहावे म्हणून सीबीडी येथील स्वातंत्र्यवीर सावरकर मैदान, सेक्टर-८ येथे आदिवासी बांधवांकरिता आमदार मंदा म्हात्रे यांच्या विकास निधीमधून आदिवासी भवन उभारण्यात आले आहे. त्याचे लोकार्पण शनिवारी (दि. ४) नवी मुंबई महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या हस्ते होणार आहे. आदिवासी समाजाचा विचार करून त्यांच्यासाठी तयार करण्यात आलेले नवी मुंबईतील हे पहिले आदिवासी भवन ठरले आहे.



नागर संस्कृतीपासून दूर व अलिप्त राहिलेले सबंधित प्रदेशातील मुळचे रहिवासी म्हणजे आदिवासी बांधव असे सामान्यप्रमाणे म्हणता येईल. सर्वसाधारण जंगलात, दुर्गम दऱ्याखोऱ्यात व संस्कृत समाजापासून तुटक असलेल्या प्रदेशात ते तुरळक वस्ती करून राहतात. आदिवासी बांधवांना ही आपली संस्कृती जपण्यासाठी व्यासपीठ मिळवून देणे गरजेचे आहे. त्या उद्देशाने आमदार म्हात्रे यांनी ही वास्तू बनवली आहे. या भवनाच्या उद्घाटनावेळी आदिवासी जीवनशैलीतील नृत्य आणि लोकनृत्य तसेच सांस्कृतिक कार्यक्रम ही आयोजित केला आहे. सीबीडी येथील सेक्टर-८मधील आदिवासी बांधवांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## अनुभवसंपन्न अधिकारी, कर्मचाऱ्यांची सेवानिवृत्ती ही संस्थेची हानी -आयुक्त

**नवी मुंबई : बातमीदार**

सेवानिवृत्ती ही प्रत्येक कर्मचाऱ्याच्या जीवनातील अपरिहार्य बाब असते, मात्र अनुभवी कर्मचारी सेवानिवृत्त झाल्याने त्या संस्थेच्या कामकाजात अशा कर्मचाऱ्यांची कमतरता जाणवते. यामुळे अनुभवसंपन्न कर्मचारी सेवानिवृत्त होणे ही एकप्रकारे त्या संस्थेची हानी असून ही हानी भरुन निघायला काही कालावधी जातो, असे मत नवी मुंबई महापालिकेचे आयुक्त राजेश नार्वेकर यांनी व्यक्त केले.



ऑक्टोबर महिन्यात सेवानिवृत्त होणाऱ्या आठ अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्ती समारंभात ते बोलत होते.

या वेळी अतिरिक्त आयुक्त सुजाता ढोले व विजयकुमार म्हसाळ, प्रशासन विभागाचे उपायुक्त शरद पवार, शहर अभियंता संजय देसाई, क्रीडा व सांस्कृतिक कार्य विभागाच्या उपायुक्त ललिता बाबर, शिक्षण विभागाचे उपायुक्त दत्तात्रय घनवट, सहाय्यक संचालक नगररचना सोमनाथ केकाण, महापालिका सचिव चित्रा बाविस्कर, अतिरिक्त शहर अभियंता मनोज पाटील व शिरीष आरदवाड आणि इतर उपस्थित होते.

ऑक्टोबरमध्ये सेवानिवृत्त होणारे सहाय्यक आयुक्त महेंद्र सप्रे, कार्यकारी अभियंता सुनिल लाड, प्रशासकीय अधिकारी सर्वश्री अरविंद उरसळ, सुधाकर लोहार, रोहिदास जाधव तसेच मुख्याध्यापक व्यंकटेश कांबळे, प्राथमिक शिक्षक कामिनी आंग्रे व पद्माकर पाटील अशा आठ कर्मचाऱ्यांचा विशेष गौरव करण्यात आला.

प्रातिनिधीक स्वरुपात सत्काराला उत्तर देताना सहाय्यक आयुक्त महेंद्र सप्रे यांनी, नवी मुंबई महानगरपालिका या आपल्या संस्थेप्रती निष्ठा बाळगून सोपविलेले काम प्रामाणिकपणे पार पाडले, याचे अतिशय समाधान वाटते असे सांगितले. प्रशासकीय अधिकारी अरविंद उरसळ व सुधाकर लोहार आणि मुख्याध्यापक व्यंकटेश कांबळे यांनीही सत्काराला उत्तर देताना सहकारी अधिकारी, कर्मचारी यांचे आभार व्यक्त केले.

## वृद्ध महिलेची केली फसवणूक

**पनवेल : वार्ताहर**

पोलीस असल्याची बतावणी करणाऱ्या दोघा भामट्यांनी कामोठे भागात राहणाऱ्या एका वृद्धेची दिशाभूल करून तिच्याजवळचे ७५ हजार रुपये किमतीचे दागिने लुबाडल्याची घटना घडली. याप्रकरणी कामोठे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल आहे.

कामोठे सेक्टर-१८मध्ये राहणाऱ्या सुलोचना मोरे (वय ७१) सकाळी घराजवळ असलेल्या स्वामी समर्थांच्या मठात आरतीसाठी गेल्या होत्या. दुपारी १ वा. च्या सुमारास घरी परतत असताना रस्त्यात एकाने त्यांना अडवून पोलीस असल्याचे सांगत अंगावरील दागिने काढून ठेवण्यास सांगितले होते. त्यामुळे घाबरलेल्या सुलोचना मोरे यांची दागिने काढले. हे दागिने घेऊन चोरटा पसार झाला.



**पनवेल : खारकोपर (गव्हाण) येथील ॐश्री साई सेवा समितीतर्फे आयोजित खारकोपर ते शिर्डी पालखी पदयात्रेचा शुभारंभ बुधवारी करण्यात आला. या वेळी पालखी सोहळ्याला शुभेच्छा देण्यासाठी मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.**

# नागोठण्याचा चेहरामोहरा बदलणार

## आमदार अनिकेत तटकरेंचे प्रतिपादन; परिवर्तन पॅनलची रॅली व सभा

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे ग्रामपंचायत निवडणुकीत विरोधकांकडे कुठलाही विकासाचा अजेंडा नसल्यामुळे ते आपल्यावर टीका करीत आहेत, परंतु आपल्याला पुढील पाच वर्षांत नागोठण्याचा चेहरामोहरा बदलायचा आहे. येथील विकासासाठी अडीच कोटी रुपयांचा निधी विरोधकांकडून पेंडिंग आहे. आता भाजप व शिवसेना आपल्यासोबत एकत्र आल्यामुळे नागोठण्याच्या विकासासाठी १० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देणार असल्याचे अभिवचन आमदार अनिकेत तटकरे यांनी दिले.



प्रचार रॅलीला मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे परिवर्तन पॅनलच्या सरपंचपदाच्या उमेदवार मनिषा टके व इतर सर्व १६ सदस्य निवडून येणारच, असा विश्वासदेखील या वेळी आमदार तटकरे यांनी व्यक्त केला.

नागोठणे ग्रामपंचायत निवडणुकीत परिवर्तन पॅनलची प्रचार रॅली काढण्यात आली होती. या रॅलीस मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. रॅलीची सांगता झाल्यानंतर भाजप जिल्हा उपाध्यक्ष तथा ग्रामपंचायत सदस्यपदाच्या उमेदवार श्रेया केदार कुंटे यांच्या निवासस्थानी प्रचार सभा झाली. त्या वेळी आमदार अनिकेत तटकरे बोलत होते. शिवसेना नेते अ‍ॅड. मनोजकुमार शिंदे, राष्ट्रवादीचे नेते नरेंद्र जैन, दिलीप टके, विलास चौलकर, शिवराम शिंदे, बाळासाहेब टके, चंद्रकांत गायकवाड, राकेश शिंदे, संतोष कोळी, विनय गोळे, अतुल काळे, सचिन कळसकर, निवास पवार, सुधाकर जवके, राजेश पिंपळे, भारत भोय, मंगेश तेरडे, रिचा राजेंद्र धात्रक, अमिता शिंदे, सुजाता जवके, नंदा गायकवाड, भाजपचे नेते मारुती देवरे, सोपान जांबेकर, आनंद लाड, किशोर म्हात्रे, सिराज पानसरे, विवेक रावकर, अशोक अहिरे, रऊफ कडवेकर, केदार कुंटे, संजय नांगरे, शिंदे गटाचे प्रकाश मोरे, प्रवीण ताडकर, मनोज खांडेकर, आकाश मढवी, अमित खामकर, लीलाधर तुरे, मंदार कोतवाल आदींसह पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते.

आपल्या उमेदवारांना मतदारांचा मिळणारा प्रतिसाद पाहून विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकली आहे. खासदार सुनील तटकरेसाहेब, आमदार रविशेठ पाटीलसाहेब, मंत्री अदितीताई व मी तसेच शिवसेनेच्या माध्यमातून नागोठण्याच्या विकासासाठी करोडो रुपयांचा निधी उपलब्ध झालेला, मात्र विरोधकांनी एनओसी न दिल्यामुळे कळत न कळत त्यांनी विकास नाकारला. आता आपण आपली सत्ता आणून विकास साधूया, असे आवाहन आमदार अनिकेत तटकरे यांनी केले.

# अलिबाग तालुक्यात धुमाकूळ घालणारा सोनसाखळीचोर जेरबंद

## स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेची कारवाई



**अलिबाग : प्रतिनिधी**

तालुक्यात सोनसाखळी चोरणाऱ्या चोरट्याविरुद्ध पोलिसांनी धडक मोहीम उघडली आहे . तालुक्यातील पेढांबे, परहूरपाडा, सहाणगोटी अशा तीन वेगवेगळ्या घटनांमध्ये महिलांच्या गळ्यातील सोनसाखळी चोरणाऱ्या पनवेल करंजाडे येथील चोरट्यास स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने जेरबंद केले आहे.

निखिल पद्माकर म्हात्रे असे या चोरट्याचे नाव आहे. त्याच्याकडून सहा लाख रुपये किमतीचे १२४ ग्रॅम सोने आणि दीड लाख रुपयांची दुचाकी जप्त करण्यात आली आहे. त्याला न्यायालयाने तीन दिवस पोलीस कोठडी दिली आहे.

पोयनाड पोलीस ठाण्याच्या हद्दीत १४ ऑगस्ट २०२३ रोजी पेढांबे येथील महिला गावातून जात असताना एका मोटरसायकलस्वाराने त्यांच्या पाठीमागून येऊन मानेवर हात टाकून गळ्यातीत सोन्याचे गंठन व छोटे मंगळसूत्र हिसकावून जबरी चोरी केली होती.

अलिबाग पोलीस ठाणे हद्दीत १५ जुलै रोजी परहूरपाडा येथील महिला शेतावरून चालत घरी येत असताना झालखंड डांबरी रोडवर परहूरपाडा या गावच्या बाजूकडून अज्ञात दुचाकीवरुन आलेल्या अज्ञात इसमाने त्यांना धक्काबुकी करून खाली पाडले आणि गळ्यामधील सोन्याची चेन जबरदस्तीने हिसकावून चोरून नेली.

तिसऱ्या घटनेत अलिबाग पोलीस ठाणे हद्दीतच २ ऑक्टोबर रोजी सहाणगोटी येथे महिला चालत जात असताना रस्त्यात एक दुचाकीवरील इसमाने त्यांच्यामागून गाडी आणून गळ्यातील सोन्याची दागिने खेचून चोरी करून नेली होती. या तिन्ही प्रकरणांत पोयनाड पोलीस ठाण्यात एक, तर अलिबाग पोलीस ठाण्यात दोन गुन्हे दाखल झाले होते. सोनसाखळी चोरीच्या गुन्ह्यांचे गांभीर्य पाहून पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी या गुन्ह्याचा समांतर तपास करण्याचे आदेश स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक बाळासाहेब खाडे यांना दिले होते. त्यानुसार खाडे यांच्या अधिपत्याखाली उपनिरीक्षक धनाजी साठे यांच्या टीमने या गुन्ह्यांचा समांतर तपास सुरू केला.

तपासादरम्यान पथकाने या गुन्ह्यांमधील सीसीटीव्ही फुटेज प्राप्त करून संशयित सोनसाखळीचोरांचा शोध सुरू केला. गोपनीय बातमीदारातर्फे माहिती मिळाली की, या गुन्ह्यातील आरोपी पनवेल परिसरातील आहे. त्या माहितीच्या आधारे पनवेल करंजाडे येथून संशयितास ताब्यात घेऊन सीसीटीव्ही फुटेज मध्ये असलेला इसम तोच असल्याची खात्री करून त्याची कसून चौकशी केली. त्याने तिन्ही सोनसाखळी चोरीचे गुन्हे केले असल्याची कबुली दिली.

आरोपी निखिल पद्माकर म्हात्रे याला पोलिसांनी अटक केली आहे. त्याच्याकडून तिन्ही गुन्ह्यातील चोरी केलेले एकूण १२४ ग्रॅम सोने (अंदाजे किंमत सहा लाख २० हजार रुपये) तसेच दीड लाख रुपये किमतीची दुचाकी जप्त करण्यात आली आहे. आरोपीला न्यायालयाने तीन दिवस पोलीस कोठडी दिली असून त्याने आणखी अशाच प्रकारे गुन्हे केले आहेत का याचा सखोल तपास सुरू आहे.

स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक बाळासाहेब खाडे व त्यांच्या टीममधील उपनिरीक्षक धनाजी साठे, हवालदार जितेंद्र चव्हाण, हवालदार रुपेश निगडे, महिला हवालदार अभियंती मोकल, नाईक विशाल आवळे, शिपाई अक्षय सावंत, स्वामी गावंड यांनी ही कामगिरी केली आहे.

# निजामपूर विभागात ठाकरे गटाला धक्का

## शिरसाटच्या अनिल मोरेंचा शिवसेनेत प्रवेश



**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील निजामपूर विभागात ग्रामपंचायत निवडणुकीच्या धामधुमीत उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाला जोरदार धक्का बसला आहे. या विभागातील ठाकरे गटाचे शिरसाट येथील कार्यकर्ते अनिल मोरे यांनी आमदार भरत गोगावले यांच्या उपस्थितीत बुधवारी (दि. १) जाहीर प्रवेश केला.

शिरसाट गावी झालेल्या या पक्षप्रवेश कार्यक्रमास शिवसेनेचे जिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर, ज्येष्ठ नेते राजाभाऊ रणपिसे, माणगाव तालुकाप्रमुख अ‍ॅड. महेंद्र मानकर, माणगाव पंचायत समितीचे माजी सदस्य सुधीर पवार, मनोज सावंत, उपतालुकाप्रमुख, विभागप्रमुख, शाखाप्रमुख यांच्यासह निजामपूर विभागातील शिवसेना, युवा सेनेचे आजी-माजी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## दर्पण दरेकर मनसे पोलादपूर तालुकाध्यक्षपदी

**पोलादपूर : प्रतिनिधी**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पोलादपूर शहर अध्यक्ष दर्पण दरेकर यांची आता तालुका अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तसे पत्र मनसे नेते संदीप देशपांडे यांनी दिले आहे.

पोलादपूर शहरामध्ये मनसेनेच्या विद्यार्थी सेनेपासून कार्यकर्ते असलेले दर्पण दरेकर यांनी गेल्या १५ वर्षांमध्ये कार्यरत राहून पक्षात स्थान निर्माण केले आहे.

# घरातून २५ हजार रुपये चोरून अज्ञात चोरटा पसार

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील निजामपूर गावात एका महिलेच्या घरातून पर्समध्ये ठेवलेले २५ हजार रुपये घेऊन अज्ञात चोरटा पसार झाला आहे. या घटनेची फिर्याद कमलेश देविदास अहिरे यांनी माणगाव पोलीस ठाण्यात दिली. त्यानुसार अज्ञात आरोपीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत माणगाव पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की, घटनेतील फिर्यादी कमलेश देविदास अहिरे यांच्या राहत्या घरामध्ये त्यांच्या पत्नीच्या पर्समधील पाऊचमध्ये ठेवलेली २५ हजार रुपयांची रक्कम अज्ञात चोरट्याने चोरून नेली. या घटनेची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात करण्यात आली असून या गुन्ह्याचा अधिक तपास हवालदार तुणतुणे करीत आहेत.

# शून्य मशागत लागवडीच्या तंत्राचे नेरळमध्ये प्रात्यक्षिक

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या उत्कर्षासाठी मुंबई येथील युनायटेड वे ही सामाजिक संस्था काम करीत आहे. याच माध्यमातून भात लागवडीच्या शून्य मशागत पद्धतीने प्रशिक्षण दिले जात आहे. त्यात भात लागवडीची एसआरटी पद्धत यशस्वी करणारे तंत्रज्ञानांची माहिती आणि प्रात्यक्षिक देण्यासाठी सगुणाबाग कृषी पर्यटन केंद्रात शेतकरी आले होते.

शून्य मशागत लागवडीचे तंत्र कृषीरत्न शेतकरी शेखर भडसावळे यांनी शोधून काढले आहे. या तंत्रामुळे भातासह अन्य पिकांची शेती करणे सोपे झाले आहे. यासाठी युनायटेड वे ही संस्था पुढाकार घेत आहे. याच माध्यमातून वारे ग्रामपंचायतीमधील शेतकऱ्यांसाठी सगुणाबाग येथे शेतकऱ्यांचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते.

या प्रशिक्षणास आदिवासी बहुल भागातील गावातील नागेवाडी, मार्गाचीवाडी, मोरेवाडी, डोंगरपाडा, वारे, खांडस, इष्टे जांभूळवाडी, बांगरवाडी, पेटारवाडी आणि गावंडवाडी येथील २२ शेतकरी आवर्जून उपस्थित होते. त्याचप्रमाणे जल संजीवनी प्रकल्प कर्जत टीम सदस्य मंगेश बोपचे, जोएब दाऊदी, विवेक कोळी, गायत्री ऐनकर, जयश्री ऐनकर, अमर पारधी, जगदीश भला, दीपक कवठे, प्रमोद धादवड उपस्थित होते.



# शामराव पेजे कोकण इतर मागासवर्गीय महामंडळाच्या विविध कर्ज योजना

राज्यातील इतर मागासवर्गीय (ओबीसी) समाजातील दुर्बल घटकांच्या सर्वांगीण कल्याणासाठी शासनाने या महामंडळाची स्थापना केली आहे. समाजातील इतर मागासवर्गीयांच्या अर्थिक उन्नतीसाठी महामंडळामार्फत स्वयंरोजगाराच्या विविध कर्ज योजना राबविण्यात येतात. छोटे व्यावसायिक व स्वयंरोजगाराकरीता रु.१ लक्षची थेट कर्ज योजना (नियमित परतफेड करणाऱ्या लाभार्थींना व्याज नाही) व २० टक्के बीज भांडवल योजना तसेच ऑनलाईन योजनांमध्ये वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना १० लक्ष रुपयेपर्यंत, गट कर्ज व्याज परतावा योजना १० लक्ष ते ५० लक्ष रुपयेपर्यंत आहे. तसेच यात शैक्षणिक कर्ज व्याजपरतावा योजना या योजनांचा समावेश असून राज्यांतर्गत व देशांतर्गत अभ्यासक्रमासाठी महत्त्म कर्ज मर्यादा १० लक्ष रुपयेपर्यंत व परदेशी अभ्यासक्रमासाठी जास्तीत जास्त कर्ज मर्यादा २० रुपये लक्षपर्यंत आहे.

### विविध योजनांची वैशिष्ट्ये

एक लक्ष रुपये थेट कर्ज योजना-सिबील क्रेडीट स्कोर किमान ५०० असलेल्या लाभार्थींना सदर कर्ज महामंडळातर्फे दिले जाते. कर्ज परतफेडिचा कालावधी चार वर्ष आहे. अर्जदाराचे वयाची मर्यादा १८ ते ५५ वर्षे आहे.कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या लाभार्थींना व्याज आकारण्यात येणार नाही. मासिक हप्ता रु.२८०५/-.

२० टक्के बीज भांडवल योजना-कर्जाची उच्तम मर्यादा रु.५.०० लक्षपर्यंत. कर्ज परतफेडीचा कालावधी पाच वर्षे आहे. अर्जदाराचे वयाची मर्यादा १८ ते ५० वर्षे आहे. बँकेमार्फत लाभार्थींना ७५ टक्के कर्ज उपलब्ध् केले जाते. यामध्ये लाभार्थींचा सहभाग पाच टक्के महामंडळाचा सहभाग २० टक्के बँकेचा सहभाग ७५ टक्के महामंडळाच्या कर्ज रक्कमेवर व्याजाचा दर ६टक्के असतो.

वित्तीय वर्षाकरिता २०२३-२४ या विविध कर्ज योजनांचे रायगड जिल्ह्यासाठी उद्दिष्ट प्राप्त झाले आहे. थेट कर्ज योजना भौतिक उद्दिष्ट-१०० व २० टक्के बीज भांडवल योजना भौतिक उद्दिष्ट-४९ प्राप्त झाले असून या योजनांचे अर्ज जिल्हा कार्यालयात सशुल्क् उपलब्ध आहे.

लागणारी सर्वसाधारण कागदपत्रे-पासपोर्ट साईज दोन फोटो, तहसीलदार/नायब तहसीलदार यांनी दिलेला उत्पन्नाचा मुळ दाखला (ग्रामीण व शहरी भागासाठी कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न मर्यादा १.०० लक्ष सक्षम अधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र (इ.मा.व.) दरपत्रक (कोटेशन), प्रकल्प अहवाल, आधारकार्ड, पॅनकार्ड किंवा निवडणूक ओळखपत्र व शिधापत्रिकेची झेरॉक्स, सिबील क्रेडिट रिपोर्ट-थेट कर्ज योजनेकरीता (स्कोर किमान ५०० असावा), स्थानिक स्वराज्य् संस्थेचे (ग्रामपंचायत/नगरपालिका) व्यवसाय करण्याबाबतचे ना हरकत प्रमाणपत्र, डोमिसाईल किंवा रहिवासी दाखला, आधारकार्ड लिंक केलेल्या पासबुकची झेरॉक्स, वयाच्या पुराव्यासाठी शैक्षणिक अर्हतेचे प्रमाणपत्र/जन्मतारखेचा दाखला, भाडेकरार किंवा संबंधित जागा मालकाचे संमतीपत्र व व्यवसायाच्या जागेचा असेसमेंट उतारा इ.कागदपत्रे लागतात.

### ऑनलाईन योजना

वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना व गट कर्ज व्याज परतावा योजना-वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेत भौतिक उद्दिष्ट-१२४ व गट कर्ज व्याज परतावा योजनेत भौतिक उद्दिष्ट-२५ आहे. या योजनांकरीता महामंडळाच्या www.msobcfdc.org या संकेतस्थळाला भेट देऊन ऑनलाईन अर्ज दाखल करता येईल.

वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना १० लक्ष रुपयेपर्यंत योजना संपूर्णपणे संगणीकृत आहे. या योजनेमध्ये बँकेने १० लाख रुपयेपर्यंतच्या मर्यादेत कर्ज मंजूर केलेल्या अर्जदाराने कर्जाचे हप्ते नियमित भरल्यानंतर व्याजाची रक्कम (१२ टक्के मर्यादेत) अर्जदाराच्या अधार लिंक बँक खात्यात दरमहा महामंडळामार्फत जमा करण्यात येते. या योजनेचा कालावधी पाच वर्ष असेल तसेच योजनेसाठी अर्जदाराचे वय १८ ते ५० असावे. अर्जदाराचे कौटुंबिक वार्षिक उत्पन् मर्यादा आठ लक्ष रुपयेपर्यंत (सक्षम प्राधिकरणाने वेळोवेळी दिलेल्या प्रमाणपत्रानुसार) कुटूंबातील एकाच व्यक्तीला या योजनेचा लाभ घेता येईल. अर्जदाराचे आधार संलग्न् बँक खाते असणे अनिवार्य आहे. महामंडळाच्या www.msobcfdc.org (व्याज परतावा योजना पर्याय) या वेबपोर्टलवर ऑनलाईन पद्धतीने कर्ज अर्ज भरणे आवश्यक् आहे. महामंडळाच्या अटी व शर्तीनुसार संगणीकृत सशर्त हेतूपत्र (Letter of Intent) दिले जाईल. अर्जदारास या आधारे बँकेकडून कर्ज मंजूर करुन घ्यावे लागेल.

गट कर्ज व्याज परतावा योजना-१० लक्ष रुपये ते ५० लक्ष रुपयेपर्यंत इतर मागासवर्गीय प्रवर्गातील महामंडळाच्या निकषांनुसार विहीत केलेल्या वार्षिक उत्पन्न मर्यादेतील उमेदवारांच्या बचत गट, भागीदारी संस्था, सहकारी संस्था, कंपनी (कंपनी अधिनियम २०१३ अंतर्गत) LLP, FPO अशा शासन प्रमाणिकरण प्राप्त संस्थांना बँकेमार्फत स्वयंरोजगार उद्योग उभारणीसाठी जे कर्ज दिले जाईल त्या कर्ज रक्कमेवरील व्याज परतावा हा बँक प्रमाणीकरणानुसार महामंडळाकडून अदा केला जाईल. कौटुंबिक वार्षिक उत्पन्न मर्यादा रु. आठ लक्षपर्यंत असलेल्या उमेदवाराच्या गटास बँकेकडून रु.१० लक्ष ते रु.५० लक्षपर्यंत मंजूर उद्योग उभारणीकरिता कर्ज उपलब्ध् केले जाईल. गटातील सदस्यांचे वय १८ ते ४५ पर्यंत असावे. गटातील सर्व सदस्यांचा सिबिल क्रेडीट स्कोअर किमान ५०० इतका असावा.

परतफेडीचा कालावधी मंजूर कर्जावर पाच वर्षांपर्यंत अथवा कर्ज कालावधी यापैकी जो कमी असले ते कर्ज मंजूर केलेल्या गटाने वेळेत कर्जाचे हप्ते भरल्यास, हप्ता भरल्यावर (जास्तीत जास्त् १२ टक्के व्याज दराच्या आणि रु.१५ लाखाच्या मर्यादेत) त्यातील व्याजाची रक्कम त्यांच्या आधार लिंक बँक खात्यात दरमहा महामंडळामार्फत जमा करण्यात येईल. महामंडळाच्या www.msobcfdc.org (व्याज परतावा योजना पर्याय) या वेबपोर्टलद्वारे गटाचा ऑनलाईन पद्धतीने कर्ज अर्ज भरणे आवश्यक् आहे. महामंडळाच्या अटी व शर्तीनुसार संगणीकृत सशर्त हेतुपत्र (Letter of Intent) दिले जाईल. गटास या आधारे बँकेकडून कर्ज मंजूर करुन घ्यावे लागेल.

शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजना-इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाकरिता बँकेमार्फत मंजूर केलेल्या रु.२० लक्षपर्यंत कर्ज रक्कमेवरील व्याज परताव महामंडळाकडेन वितरीत केला जाईल.

योजनेचे स्वरुप-राज्यांतर्गत व देशांतर्गत अभ्यासक्रमासाठी महत्त्म कर्ज मर्यादा रु.१० लक्षपर्यंत व परदेशी अभ्यासक्रमासाठी महत्त्म कर्जमर्यादा रु.२० लक्षपर्यंत आहे.

लाभार्थी पात्रतेच्या अटी व शर्ती-अर्जदाराचे वय १७ ते ३० वर्षे असावे. अर्जदार हा इतर मागास प्रवर्गातील असणे तसेच तो महाराष्ट्राचा रहिवासी असावा. अर्जदाराचे कौटुंबिक वार्षिक उत्पन्न मर्यादा ग्रामीण व शहरी भागाकरिता आठ लक्ष रुपयेपर्यंत असावी. अर्जदार हा इयत्ता बारावी ६० टक्के गुणासह पदवीका (Diploma) उत्तीर्ण असणे आवश्यक् आहे. अर्जदाराचा सिबील क्रेडिट स्कोअर किमान ५००पेक्षा अधिक असावा.

कर्ज प्रस्तावासोबत जोडायची कागदपत्रे-अर्जदाराचा इतर मागास प्रवर्गातील जातीचा दाखला, तहसिलदार यांचा उत्पन्नाचा दाखला, तहसीलदार यांचा महाराष्ट्र रहिवासी (वय अधिवास) दाखला, अर्जदार व अर्जदाराचे पालक यांचे आधार कार्ड, ज्या अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक कर्ज आवश्यक आहे तसेच त्या अभ्यासक्रमासाठीची पात्रता उत्तीर्ण परिक्षेची गुणपत्रिका, अर्जदार व अर्जदाराचे पालक यांचे पासपोर्ट फोटो, अर्जदाराचा जन्माचा/वयाचा पुरावा, शैक्षणिक शुल्क संबंधित पत्र, शिष्यवृत्ती (Scholarship) शैक्षणिक शुल्कमाफी (Freeship) पात्रतेबाबतचे प्रमाणपत्र, मान्यताप्राप् संस्थेत प्रवेश घेतल्याचा पुरावा, आधार संलग्न बँक खाते पुरावा.

व्याज परतावा व परतफेडीचा कालावधी-शिक्षण पूर्ण केलेल्या अर्जदाराने बँकेने मंजूर केलेल्या कर्जाची नियमित परतफेड केलेल्या हप्त्यामधील नियमित असलेल्या व्याज रक्कमेचा परतावा (कमाल १२ टक्केपर्यंत) महामंडळ अदा करेल तसेच व्याज परतावासाठी जास्तीत जास्त पाच वर्षे कालवधी ग्राह्य धरण्यात येईल.

इच्छुक गरजु इतर मागासवर्गीय (ओबीसी) प्रवर्गातील व्यक्तींनी योजनांच्या अधिक माहितीकरिता शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळ लि.चे जिल्हा कार्यालय-श्रीराम समर्थ गृहनिर्माण संस्था मर्या. सदनिका क्र.१०१, पहिला मजला चेंढरे, पो. ता.अलिबाग,जि. रायगड, पीनकोड ४०२२०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४१-२२४४४८ वा Email- dmobcalibagraigad@gmail.com येथे संपर्क साधावा. तसेच अधिक माहितीसाठी www.msobcfdc.org या संकेतस्थळाला भेट द्यावी. विविध योजनांसाठी अर्ज करताना आवश्यक कागदपत्रे, पुरावे हे सादर करणे आवश्यक आहे.

**-निशिकांत नार्वेकर,**
**जिल्हा व्यवस्थापक, अलिबाग-रायगड**
**(संकलन : जिल्हा माहिती कार्यालय, अलिबाग-रायगड)**

# आजपासून घुमणार कबड्डीचा दम

## महाराष्ट्र विरुद्ध पंजाब पुरुषांचा उद्घाटनीय सामना

**पणजी : वृत्तसंस्था**

महाराष्ट्र विरुद्ध पंजाब या पुरुषांच्या सामन्याने ३७व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील कबड्डी स्पर्धेला प्रारंभ होईल. गोवा येथील मल्टी पर्पज क्रीडा संकुलात ३ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५ वा. हा उद्‌घाटनीय सामना होईल, तर त्याच दिवशी सायंकाळी ६ वा. महाराष्ट्र विरुद्ध हिमाचल प्रदेश अशी महिलांत लढत होईल.

महाराष्ट्राच्या पुरुषांचा अ गटात समावेश असून पंजाब, तामिळनाडू, चंदीगड या अन्य संघाचा या गटात समावेश आहे. महाराष्ट्राच्या महिलांचा ब गटात समावेश असून राजस्थान, उत्तर प्रदेश, गोवा हे अन्य संघ त्या गटात आहेत.



गटवार साखळीवर नजर मारली असता पुरुषांना पेपर तसा सोपा वाटतो तर महिलांना तो थोडा कठीण जाईल असा वाटतो. महिलांचा पहिलाच सामना राष्ट्रीय सामन्यात दमदार कामगिरी केलेल्या हिमाचलशी होणार आहे. पण एकंदर पाहता महाराष्ट्राचा महिलांचा संघ समतोल वाटतो. संघनायिका हरजीत कौर संधू, सायली जाधव, पूजा शेलार, पौर्णिमा जेधे, अंकिता जगताप यांचा खेळ या सामन्यात कसा बहरतो व प्रशिक्षक राजेश पाडावे या सर्व खेळाडूंचा कसा वापर करतो यावर सामन्याचे भवितव्य अवलंबून आहे. पुरुषांचा संघातदेखील अष्टपैलू खेळाडूंचा भरणा आहे. शंकर गदई, असलम इनामदार, आकाश शिंदे, मयूर कदम, अरकम शेख, आदित्य शिंदे, संघनायक किरण मगर आदी खेळाडूंच्या खेळावर महाराष्ट्राचे यशापयश अवलंबून आहे. गतवर्षी महाराष्ट्राचे सुवर्णपदक थोडक्यात हुकले होते यंदा ते मिळवायचे या इराद्याने पुरुष संघ प्रशिक्षक दादासो आव्हाड यांच्या मार्गदर्शनाखाली जोरदार प्रयत्न करणार आहे. संघाची तयारी पहाता गतवर्षी दोन्ही संघाचे हुकले सुवर्णपदक यंदा महाराष्ट्र मिळवेल असे आता तरी वाटते.

**स्पर्धेची गटवारी खालीलप्रमाणे**

पुरुष विभाग : अ गट-महाराष्ट्र, तामिळनाडू, चंदीगड, पंजाब; ब गट-उत्तर प्रदेश, हरियाणा, सेनादल, गोवा.

महिला विभाग : अ गट-हरियाणा, झारखंड, पंजाब, गोवा; ब गट-हिमाचल प्रदेश, राजस्थान, उत्तर प्रदेश, महाराष्ट्र.

दरम्यान, महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या वतीने परभणी मानवत येथे ५ नोव्हेंबरपासून होणारी किशोर-किशोरी गट राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा मराठा आंदोलनामुळे पुढे ढकलण्यात आली आहे.

मराठा आंदोलन दिवसेंदिवस अधिक अधिक उग्र स्वरूप घेत आहे. एकूणच मराठा आंदोलनाची तीव्रता लक्षात घेऊन परिस्थिती पूर्वपदावर आल्याची खातरजमा करून लवकरच पुढील तारखा जाहीर करण्यात येतील. सर्व संघटना, खेळाडू, सामणाधिकारी व कार्यकर्ते यांना झालेल्या तसदीबद्दल महाराष्ट्र राज्य संघटनेकडून दिलगिरी व्यक्त करण्यात आली आहे. तशा प्रकारचे परिपत्रक महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे सचिव बाबुराव चांदेरे यांनी प्रसारमाध्यमांद्वारे जारी केले आहे.

# विराटने मोडला सचिनचा विक्रम

## एका कॅलेंडर वर्षात सर्वाधिक आठ वेळा केल्या एक हजार धावा

**मुंबई : प्रतिनिधी**

भारताचा स्टार फलंदाज विराट कोहली याने माजी क्रिकेटपटू मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरचा एक मोठा विक्रम मोडला आहे. विराट आता एका कॅलेंडर वर्षात सर्वाधिक आठ वेळा एक हजार धावा करणारा फलंदाज बनला आहे.



आशिया कपनंतर विराट कोहलीने हरवलेला फॉर्म परत मिळवला आहे. त्याआधी विराट सुमारे अडीच वर्षे सतत फ्लॉप होत होता आणि एकही शतक त्याला झळकावता आले नाही, पण आता विराटच्या बॅट चांगली तळपत आहे. तो प्रत्येक सामन्यात धावा करीत आहे. श्रीलंकेविरुद्ध गुरुवारी (दि. २) झालेल्या सामन्यात विराटने ३४ धावा करताच तो एकदिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये एका कॅलेंडर वर्षात आठ वेळा एक हजार धावा करणारा जगातील एकमेव फलंदाज बनला आहे. त्याचबरोबर त्याने सचिन तेंडुलकरला मागे टाकले. सचिनने १९९४, १९९६, १९९७, १९९८, २०००, २००३ आणि २००७ साली एक हजार धावांचा टप्पा पार केला होता.

पहिल्याच ओव्हरच्या दुसऱ्या चेंडूवर रोहित शर्मा बाद झाल्यानंतर विराट मैदानावर आला. त्याने सलामीवीर शुभमन गिलसह फक्त संघाचा डाव सावरला नाही, तर वैयक्तीक एक मोठा विक्रमदेखील केला. श्रीलंकेविरुद्ध विराट कोहलीने ११व्या षटकाच्या पाचव्या चेंडूवर एक धाव घेतली. ही त्याच्या डावातील ३४वी धाव होती. यासह वनडेत या कॅलेंडर वर्षात त्याच्या एक हजार धावा पूर्ण झाल्या. त्यानंतर विरटाने ५० चेंडूंत वनडे क्रिकेटमधील आणखी एक अर्धशतक पूर्ण केले.

विराटने या वर्ल्डकपमधील चौथे अर्धशतक पूर्ण केले आणि श्रीलंकेविरुद्धचे हे त्याचे १२वे अर्धशतक ठरले. विराटने वनडे वर्ल्डकप स्पर्धेच्या ३३ इनिंग्जमध्ये १३वेळा फिफ्टी प्लस धावा करताना कुमार संगकारा, शाकिब अल हसन व रोहित शर्मा यांचा (१२) विक्रम मोडला. सचिनच्या नावावर सर्वाधिक २१ वेळा (४४ इनिंग्ज) फिफ्टी प्लस धावा करण्याचा विक्रम आहे.

श्रीलंकेविरुद्ध सर्वाधिक आंतरराष्ट्रीय धावा करणाऱ्या फलंदाजांमध्ये विराटने (४००२*) दुसरे स्थान पटकावताना इंझमान-उल-हकला (३८२४) मागे टाकले.

# दक्षिण आफ्रिकेकडून न्यूझीलंडचा दारुण पराभव



**पुणे : प्रतिनिधी**

आयसीसी एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेतील सामना पुण्यातील एमसीएच्या मैदानावर रंगला. या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने न्यूझीलंडचा १९० धावांनी दारुण पराभव केला. दक्षिण आफ्रिका संघाने नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करताना क्विंटन डि कॉक आणि रॅसी वॅन डर डुसेनच्या शतकाच्या जोरावर ५० षटकांत चार गडी गमावून ३५७ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात न्यूझीलंड संघाचा डाव ३५.३ षटकांत १६७ धावांत गारद झाला.

न्यूझीलंडचा कर्णधार टॉम लॅथमने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. दक्षिण आफ्रिकेने ५० षटकांत चार विकेट गमावत ३५७ धावा केल्या. प्रत्युत्तरात न्यूझीलंडचा संघ ३५.३ षटकांत सर्वबाद १६७ धावांवर आटोपला. त्यांचे तीनच फलंदाज दुहेरी आकडा गाठू शकले. ग्लेन फिलिप्सने ५० चेंडूंत ६० धावा केल्या. विल यंगने ३३ आणि डॅरिल मिशेलने २४ धावा केल्या. रचिन रवींद्र आणि ट्रेंट बोल्टने प्रत्येकी नऊ धावा, मिचेल सँटनर आणि टीम साऊदीने प्रत्येकी सात धावा, टॉम लॅथमने चार आणि डेव्हन कॉनवेने दोन धावा केल्या. जेम्स नीशम शून्यावर बाद झाला. मॅट हेन्री खाते न उघडता नाबाद राहिला. दक्षिण आफ्रिकेकडून केशव महाराज आणि मार्को जॅनसेन यांनी शानदार गोलंदाजी केली. महाराजने नऊ षटकांत ४६ धावा देत चार बळी घेतले. मार्को जॅनसेनने आठ षटकांत ३१ धावांत तीन बळी घेतले. गेराल्ड कोएत्झीने दोन आणि कागिसो रबाडाला एक विकेट मिळाली.

तत्पूर्वी दक्षिण आफ्रिकेने ५० षटकांत चार गडी गमावून ३५७ धावा केल्या. आफ्रिकन संघाकडून सलामीवीर क्विंटन डी कॉक आणि हेनरिक क्लासेन यांनी शतकी खेळी खेळली. ड्युसेनने ११८ चेंडूंत १३३ धावा केल्या. डी कॉकने ११६ चेंडूंत ११४ धावांची खेळी खेळली. डुसेनने आपल्या खेळीत नऊ चौकार आणि पाच षटकार मारले, तर डी कॉकने १० चौकार आणि तीन षटकार ठोकले. डेव्हिड मिलरने ३० चेंडूंत ५३ धावा कुटल्या. त्याने दोन चौकार आणि चार षटकार मारले. कर्णधार टेंबा बावुमाने २४ धावा केल्या. हेन्रिक क्लासेन सात चेंडूंत १५ धावा करून आणि एडन मार्कराम एका चेंडूवर सहा धावा करून नाबाद राहिला. न्यूझीलंडकडून टीम साऊदीने दोन विकेट घेतल्या. ट्रेंट बोल्ट आणि जेम्स नीशम यांना प्रत्येकी एक यश मिळाले.

दक्षिण आफ्रिकेने न्यूझीलंडचा १९० धावांनी पराभव करीत विश्वचषकात सहावा विजय नोंदवला. आता त्यांचे १२ गुण झाले आहेत. दुसरीकडे न्यूझीलंडला एक स्थान गमवावे लागले. ते तिसऱ्या स्थानावरून चौथ्या स्थानावर घसरले आहेत. सात सामन्यांमधला त्यांचा हा तिसरा पराभव आहे. त्यांच्या खात्यात आठ गुण आहेत. विश्वचषकाची उपांत्य फेरी गाठण्यासाठी त्यांना उर्वरित दोन्ही सामने जिंकावे लागतील तसेच इतर संघांच्या निकालावर अवलंबून राहावे लागेल.

न्यूझीलंड संघ ४ नोव्हेंबरला पाकिस्तान आणि ९ नोव्हेंबरला श्रीलंकेविरुद्ध खेळणार आहे. दुसरीकडे दक्षिण आफ्रिकेला भारत (५ नोव्हेंबर) आणि अफगाणिस्तान (१० नोव्हेंबर) विरुद्ध शेवटचे दोन सामने खेळायचे आहेत.




## रोलर स्केटिंग चॅम्पियनशीपमध्ये पनवेलमधील खेळाडूंचे सुयश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईतील ऐरोली येथे झालेल्या जिल्हास्तरीय रोलर स्केटिंग चॅम्पियनशीपमध्ये पनवेलमधील खेळाडूंनी यश प्राप्त केले आहे.

टी ७५ रोलर स्केटिंग क्लबचे खेळाडू तुर्या प्रणाली नाईक, मेधांश नवनाथ दाते, विनित विशाल जाधव, आशिता वालावलकर, आहना सोळंकी यांनी दोन सुवर्ण, दोन रौप्य आणि आठ कांस्यपदके जिंकली. यामुळे त्यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी रायगडकडून निवड झाली आहे. या खेळाडूंना प्रशिक्षक प्रसाद महेश ढवळे यांचे मार्गदर्शन मिळत आहे.

# सचिन तेंडुलकरच्या सांगण्यावरूनच धोनी भारताचा कर्णधार बनला होता!

## जय शाहांचा मोठा खुलासा

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय क्रिकेटच्या इतिहासातील सर्वांत यशस्वी कर्णधार कोण म्हटलं की चाहते महेंद्रसिंह धोनीचे नाव घेतात. धोनीच्या नेतृत्वात टीम इंडियाने तीनवेळा आयसीसीचा किताब जिंकला. माहीने २००७मध्ये ट्वेंटी-२० विश्वचषकात भारताला चॅम्पियन बनवले, तर २०११मध्ये २८ वर्षांचा दुष्काळ संपवून भारताला वन डेमध्ये चॅम्पियन बनवले. धोनीने कर्णधारपदाची धुरा स्वीकारल्यानंतर भारतीय क्रिकेटला एक नवीन वळण मिळाले, पण धोनीला भारताचा कर्णधार बनवण्यात मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरचा हात होता, असा खुलासा बीसीसीआयचे सचिव जय शाह यांनी केला आहे.




ज्या भूमीत क्रिकेटचा सचिन घडला त्या मुंबईतील ऐतिहासिक वानखेडे स्टेडियमवर त्याच्या या २२ फुटी पुतळ्याचे अनावरण बुधवारी करण्यात आले. अनावरण झाल्यानंतर जय शाह यांनी सचिनवर कौतुकाचा वर्षाव करताना त्याचे अभिनंदन केले. त्यांनी सांगितले की, सचिनने धोनीला कर्णधार बनवण्याचा सल्ला दिला होता. मी अनेक निर्णय घेतले आहेत त्यापैकी अनेक निर्णयांमध्ये सचिनचा सल्ला होता.

दरम्यान, सचिन तेंडुलकरची ओळख असलेला विशेष फटका मारतानाच्या शैलीतील हा पूर्णाकृती पुतळा आहे. त्याच्या नावाने असलेल्या स्टँडच्या बाजूला हा पुतळा उभारण्यात आलेला असून दिग्गजांच्या उपस्थितीत याचे अनावरण करण्यात आले. हा पुतळा चबुतऱ्यासह एकूण २२ फूट उंचीचा आहे. विजय मर्चंट सँट आणि सचिन तेंडुलकर स्टँडच्या मधोमध हा पुतळा उभारण्यात आला आहे.

# ऑस्ट्रेलियाच्या मार्शचा मायदेशी परतण्याचा निर्णय

**सिडनी : वृत्तसंस्था**



यंदाच्या एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेत ऑस्ट्रेलियाने आतापर्यंत चांगली कामगिरी केली आहे, पण विश्वचषकाच्या मध्यंतरी संघाला मोठा धक्का बसला आहे. संघाचा अनुभवी अष्टपैलू मिचेल मार्श मायदेशी परतत आहे. वैयक्तिक कारणांमुळे तो विश्वचषकाच्या मध्यावर मायदेशी जाणार आहे. यापूर्वी ग्लेन मॅक्सवेल जखमी झाला होता.

क्रिकेट ऑस्ट्रेलियाने मिचेल मार्शबद्दल माहिती दिली. आयसीसीच्या वेबसाइटवर प्रसिद्ध झालेल्या बातमीनुसार मार्शच्या पुनरागमनाबाबत कोणतेही अपडेट मिळालेले नाही. वैयक्तिक कारणास्तव तो ऑस्ट्रेलियाला परतत आहे. मार्शने या विश्वचषकात आतापर्यंत विकेट घेण्यासोबत २२५ धावा केल्या आहेत. लखनऊमध्ये श्रीलंकेविरुद्ध त्याने अर्धशतक झळकावले होते. त्यानंतर लगेचच त्याने पाकिस्तानविरुद्ध शतक झळकावले होते. मार्श हा ऑस्ट्रेलियन संघाचा महत्त्वाचा भाग असून उपांत्य फेरीपूर्वी त्याचे बाहेर पडणे संघासाठी घातक ठरू शकते.

या स्पर्धेतील पहिले दोन सामने गमावल्यानंतर ऑस्ट्रेलियाने सलग चार सामने जिंकून शानदार पुनरागमन केले. अशा स्थितीत मिचेल मार्शचे विश्वचषक सोडून ऑस्ट्रेलियात परतणे हा संघाच्या विजयरथासाठी मोठा धक्का आहे. इथून ऑस्ट्रेलियाला आपले सर्व सामने जिंकायचे आहेत. ऑस्ट्रेलियाचा पुढील सामना इंग्लंडविरुद्ध आहे.




# विराटकडून पत्नी अनुष्काचे कौतुक

**मुंबई : प्रतिनिधी**

भारताचा स्टार क्रिकेटर विराट कोहली आणि अभिनेत्री अनुष्का शर्मा या दोघांची केमिस्ट्री आपण कायमच पाहिली आहे. या दोघांनी २०१७मध्ये लग्न केले. त्यानंतर त्यांना दोन वर्षांपूर्वीच एक मुलगी झाली. विराट कोहलीने अनुष्काचे खूप कौतुक केले आहे. अनुष्का ही आई म्हणून आदर्श व्यक्त आहे तसेच तिने मुलीसाठी अनेक प्रकारचा त्याग केलाय, असे म्हणत विराटने तिच्यावर स्तुतीसुमनांचा वर्षाव केला आहे.



एका मुलाखतीत विराट कोहलीने अनुष्काबाबत अनेक गोष्टी सांगितल्या. तो म्हणाला, मला यंदाच्या विश्वचषक स्पर्धेत जे यश मिळालं आणि मी जो खेळ करू शकलो त्यामागे माझी पत्नी म्हणजेच अनुष्का शर्मा हीच आहे. माझ्या यशाचे श्रेय मी तिलाच देईन. अनुष्का आई झाल्यानंतर मुलीला आणि करिअर सांभाळणे हे ज्या पद्धतीने करते आहे त्यासाठी मला तिचे कौतुक वाटते. अनुष्का ही एक आदर्श आई आहे. आई झाल्यापासून तिच्यात एक वेगळीच ऊर्जा निर्माण झाली आहे. तिने ज्या पद्धतीने आपले करिअर आणि आईची जबाबदारी यांची सांगड घातली हे पाहून मी थक्क झालो.

आम्हाला मुलगी झाल्यानंतर अनुष्काने तिची आई म्हणून जी जबाबदारी आहे ती समर्थपणे सांभाळली. सिनेमाचे शूटिंग सुरु असतानाही अनुष्काने ज्या पद्धतीने आमच्या मुलीला सांभाळले ते सोपे नाही. तिने ज्या पद्धतीने गोष्टी आत्मसात केल्या त्या सोप्या नाहीत. जो त्याग तिने केला तो खरंच मोठा आहे. जेव्हा तुमच्या जोडीदाराला तुम्ही आई होताना पाहता तेव्हाच तुम्हाला त्या व्यक्तीच्या वेगळ्या उर्जेची जाणीव होते, असे विराटने नमूद केले.

अनुष्काकडून शिकण्यासारखे खूप काही आहे. सत्याची साथ सोडायची नाही हे मी अनुष्काकडूनच शिकलो. मला तिने हे शिकवले की जर आपण खरे असू तर आपल्याला जगाची पर्वा करण्याची गरज नाही. जेव्हा तुम्हाला माहीत असते की आपण सच्चे आहोत तेव्हा कुठल्याही कठीण समस्येतून मार्ग निघतोच. शिवाय सत्य जेव्हा इतरांसमोर येते तेव्हा त्यांनाही वस्तुस्थिती समजतेच, असेही विराटने या मुलाखतीत म्हटले.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com